

लोकनेता



**तीर्थस्वरुप आदरणीय आण्णा**

**तुमच्या आदर्शानुसार**

**वाटचाल करीत असताना**

**सत्तरी गाठली ही शब्दांजली**

**तुम्हालाच अर्पण!**

**- रामशेठ**

# लोकनेता

संकल्पना/संकलन/पुनर्लेखन/
**संपादन**
मधुकर भावे

मांडणी/ सुशांत पाटील

मुद्रितशोधन / सनतकुमार सिध्देश्वर

मुलाखती विशेष साहाय्य
श्री. जगदिश पाटील, कराड
श्री. समाधान पाटील, पनवेल

छायाचित्रे / लक्ष्मण ठाकूर

कार्यालयीन सहाय्य / तेजस सालेकर


मूल्य : ₹ अमूल्य

**प्रकाशन : २ जून २०२१**
**लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ७० वा वाढदिवस गौरव प्रकाशन**

**१९ वर्षांचे राम ठाकूर**



**७० वर्षांचे रामशेठ**



# फ्लॅशबॅक













बघता–बघता १५ वर्षांचा काळ निघून गेला. कॅलेंडरची पानं कधी उलटली गेली, आणि वर्ष कधी सरली, समजलीच नाहीत. काळाच्या विक्राळ दाढेत दिवस पटापट निघून गेले. पण या १५ वर्षांत रामशेठ ठाकूर यांच्यावर प्रेम करणाऱ्या अनेक व्यक्तिमत्वांची आठवण मात्र कायमचीच कोरली गेली आहे.. मग ते विलासराव देशमुख असतील, बॅ. अंतुले असतील, दि.बा. पाटील असतील, पतंगराव कदम असतील, रावसाहेब शिंदे असतील, या सर्व नेत्यांनी रामशेठना फार जवळून पाहिलं, अनुभवलं आणि खुल्या मनानं त्या–त्या वेळी रामशेठ यांच्यावर कौतुकाचा वर्षाव करीत आपली मनं मोकळी केली. हे महान नेते काळाच्या पडद्याआड गेले. पण स्मृतीची पाने चाळताना ही मोठी व्यक्तिमत्वं आणि त्यांचे रामशेठ यांच्याविषयीचे अत्यंत प्रेमाचे शब्द आज ७० व्या वाढदिवसाला रामशेठना आणि सर्व कार्यकर्त्यांना क्षणाक्षणाला आठवतात.. आणि मन गहिवरुन जाते.

–संपादक

# 'प्रत्येक जिल्ह्यात एक रामशेठ हवा' – विलासराव

**रामशेठ** हा निर्मळ मनाचा माणूस आहे. मी त्यांना अनेक वर्षे पाहतो आहे. जवळून पाहतो आहे, लांबूनही पाहतो आहे. त्यांच्यासारखा काम करणारा नेता प्रत्येक जिल्ह्यात असेल तर या महाराष्ट्राचे चित्र पालटायला वेळ लागणार नाही. मी त्यामुळेच नेहमी म्हणतो की, प्रत्येक जिल्ह्यात असा पुरोगामी विचाराचा, विधायक दृष्टीचा आणि शिक्षण क्षेत्रात काहीतरी नवीन घडवायची जिद्द बाळगून काम करणारा एक रामशेठ मला हवा आहे. हे स्वतःकरिता काही मागत नाहीत. दोनवेळा खासदार होते. कोणत्याही कार्यकर्त्याने खासदारकी पुन्हा हमखास घेतली असती. रामशेठ यांनी थेट निवडणूक न लढविण्याचा निर्णय केला आणि तो पाळला. राजकारणात राहून ते राजकारणाच्या बाहेर आहेत. पण, समाजकारणात मात्र सर्वस्व पणाला लावून काम करत आहेत.

एकदा मला त्यांनी पनवेलला बोलावलं. राजकीय विषय नव्हता. कबड्डी स्पर्धांचे आयोजन होते आणि त्या स्पर्धा अखिल भारतीय पातळीवरच्या. 'राजीव गांधी सुवर्णचषक राष्ट्रीय स्पर्धा. त्या स्पर्धेच्या बक्षीस वितरणाला मी गेलो. शेवटचा सामना पंजाब विरुध्द भारतीय रेल्वे होता. तो सामना बघताना अंगावर रोमांच आले. रामशेठही त्या कार्यक्रमात एवढे समरस होऊन गेले. दुसऱ्यावेळी मला त्यांनी पनवेलला नेले, ते 'मल्हार महोत्सवा'ला. प्रचंड व्यासपीठ, पुढे हजारो लोक. सांस्कृतिक कार्यक्रम कसा असावा, तो मनावर कायमचा ठसला.

तिसऱ्यांदा मी पनवेलला गेलो, श्री. प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाला. मला वाटले होत, वाढदिवस म्हणजे घरगुती कार्यक्रम असेल. पण, तिथे पोहोचल्यावर लक्षात आले की, वाढदिवसाच्या निमित्ताने स्वातंत्र्यसैनिकांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमात प्रशांतला वाढदिवसाची भेट काय द्यावी, असा माझ्या मनातला विचार मी रामशेठशी बोलतोय तोच लगेच केलेल्या भाषणात रामशेठ यांनी 'पनवेल एस.टी. स्टँडसमोर उड्डाणपूल द्या' अशी मागणी केली. आणि मी लगेच त्यांची मागणी जाहीरपणे मान्य केली. काही दिवसांनी रामशेठ माझ्याकडे आले आणि मला म्हणाले की, 'माझ्या स्पोर्टस कॉम्प्लेक्सचे भूमिपूजन करायचे आहे... मी हा सगळा तपशील अशाकरिता




सांगतो आहे की, रामशेठ हा राजकारणी माणूस नाही. खऱ्या अर्थाने ते सामाजिक नेते आहे. आता त्यांचे क्रीडासंकुल उभे राहील. मला असं कळलं की ते भजन स्पर्धा घेतात, दिवाळी अंकांना २५-२५ हजारांची बक्षिसं देतात. त्यांचं नाव रामशेठऐवजी 'दानशेठ' ठेवायला हवं होतं.

जेव्हा ते अपक्ष खासदार होते, तेव्हा त्यांच्या एका मतावर त्यावेळचे वाजपेयी सरकार वाचू शकले असते. पण विचारावर खंबीर राहून, अनेक प्रलोभने बाजूला सारुन त्यांनी मनाला योग्य वाटेल त्याप्रमाणे मतदान केले. मलाही या गोष्टीचे अप्रूप वाटते. रामशेठ कोणत्याही राजकीय पक्षात असोत. सर्व पक्षांमध्ये त्यांची जी मैत्री आहे ती निखळ मैत्री आहे. सार्वजनिक कार्यकर्त्यांनी राजकारण करताना अशा निखळ भावनांनी राजकारण केले की, महाराष्ट्राचे राजकीय वातावरण नेहमीकरिता निरोगी राहील. रामशेठ यांच्या मैत्रीच्या अनुभवावरुन सर्वच राजकीय पक्षांचे नेते माझ्या या मताला पूर्ण पाठिंबा देतील.

**(२ जून २०१२- रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवशी विलासरावांनी व्यक्त केलेल्या भावना. दुर्दैवाने विलासरावांचे दुःखद निधन १४ ऑगस्ट २०१२ रोजी झाले. )**

■

# शेतकऱ्यांची जिथे लढाई तिथे रामशेठ – दि.बा. पाटील

**रामशेठ** ठाकूर हे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय अशा सर्व क्षेत्रांतील आदराचे व्यक्तिमत्व आहे. ते आमच्या पक्षात होते, त्यानंतर ते कॉंग्रेसमध्ये गेले, ते कोणत्या पक्षात आहेत हे मी महत्वाचे मानत नाही. ते जिथे आहेत, तेथून शेतकऱ्यांवर जेव्हा जेव्हा अन्याय होईल, त्या प्रत्येकवेळी शेतकऱ्यांच्या न्याय्य बाजूला ते ठामपणे उभे आहेत, हे मला पक्के माहीत आहे. जिथं-जिथं शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे प्रश्न येतील, तिथं-तिथं रामशेठ पक्षाची बंधनं आडवी येऊ न देता अंतिम लढाईसाठी तयार असतात, हे मी स्वतः पाहिलेले आहे.

रयत शिक्षण संस्थेमध्ये रामशेठ यांनी शिक्षण घेतल्यामुळे त्यांना सामाजिक भान कायमचेच राहिलेले आहे. २३ मार्च हा शहीद दिन म्हणून आम्ही पाळतो, त्यादिवशी क्रांतिवीर भगतसिंह यांना फाशी दिली गेली, रायगडमधील शेतकऱ्यांच्या जीवन-मरणाचा लढा आम्ही त्याचदिवशी सुरू केला. रांजणपाडा येथे संघर्ष मेळाव्याला माझ्यापुढे रामशेठ ठाकूर हजर होते. आमदार प्रशांत ठाकूर होते. त्यावेळी त्यांच्या पक्षाचे सरकार होते. पण शेतकऱ्यांचे हित जिथे आहे तिथे ते पक्ष महत्वाचा मानत नाहीत म्हणून याला आम्ही 'आर-पार'चा लढा म्हणतो. अशा लढ्यात रामशेठ हिरिरीने उतरले, हे मी विसरु शकत नाही. सिडकोच्या विरोधातही शेतकऱ्यांची घरे नियमित करण्यासाठी नेहमी होत असलेल्या संघर्षात रामशेठ आघाडीवरच असतात. त्यामुळे मी या नेत्याला माझा 'संघर्ष-साथी' मानतो.

१९७० साली नवी मुंबई वसविण्याचा निर्णय झाला. आता माझ्या हयातीत गेली ४० वर्षे एक पिढी गारद झाल्यावर शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी आम्हाला लढा करावा लागतो आहे, याचा मला खेद आहे. पण आनंद या गोष्टीचा आहे की, या प्रत्येक लढ्यात रामशेठ ठाकूर आमच्यासोबत आहेत.

गेल्या वर्षी (२०१०) रांजणपाडा येथे झालेल्या शेतकऱ्यांच्या संघर्ष मेळाव्याला रामशेठ ठाकूर अगत्याने हजर होते. 'या लढाईत मला अटक झाली तरी बेहत्तर' असे त्यांनी जाहीरपणे सांगितले होते. आमदार प्रशांत ठाकूरही त्यावेळी लढाईत होते. जे.एन.पी.टी.ने शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत म्हणून जो 'आर-पार' लढा जाहीर करण्यात आला, रामशेठ त्यात आघाडीवर होते.




त्या लढाईत सर्वशक्तीने उतरण्याची घोषणा रामशेठ ठाकूर यांनी केली होती. शेतकऱ्यांची घरे नियमित करण्यासाठी सिडकोशी जो संघर्ष चालू आहे, त्या संघर्षात पहिल्या दिवसापासून रामशेठ ठाकूर अग्रभागी आहेत. ते आमच्यासोबत होते तेव्हाही आणि आमच्यासोबत राजकीयदृष्ट्या नाहीत तरीही या विषयात ते कायम आमच्याबरोबर आहेत. याचे कारण शेतकऱ्यांच्या लढ्याशी त्यांची नाळ कायमची जुळलेली आहे.

शेतकऱ्यांच्या जमिनीला मिळणाऱ्या अपुऱ्या भावाचा लढा अजून संपलेला नाही. त्यासाठीच आम्ही आर-पारची लढाई करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी जो दिवस निवडला तो २३ मार्च हा शहीद दिन... त्याचदिवशी भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु या तीन देशभक्तांना ब्रिटिशांनी फासावर चढवले. त्याविरोधात देशभर जनता रस्त्यावर आली. जिथे अन्याय होतो तिथे जनता रस्त्यावर येते म्हणून शेतकऱ्यांच्या आर-पार लढाईसाठी दिवस आम्ही निवडलेला आहे.

■

# रामशेठ सर्वांचे आधार.... - पै. बॅ. ए. आर. अंतुले



फ्लॅशबॅक

**माझे मित्र** श्री. रामशेठ यांनी राजकारण, समाजकारण आणि शैक्षणिक क्षेत्रात केलेली कामगिरी अत्यंत कौतुकास्पद आहे. त्यांनी सुरु केलेल्या लॉ कॉलेजच्या उद्घाटनाला मी उपस्थित होतो. त्यांच्या सर्व शिक्षण संस्थांमध्ये गोरगरीब विद्यार्थ्यांना सहज प्रवेश मिळतो, हे मी पाहिले आहे. यामुळे मला रामशेठ या व्यक्तिमत्वाबद्दल अत्यंत आदर आहे. पनवेल आणि उरण याठिकाणी रामशेठ यांनी उभी केलेली सामाजिक कामे गौरवास्पद आहेत. समाजकारण करताना रामशेठ त्याची कधी राजकारणाशी सांगड घालत नाहीत. प्रसंगी राजकारण बाजूला ठेवतील. समाजकारणाला महत्व देतील. त्यामुळेच राजकारणाच्या बाहेरचे कित्येक कार्यक्रम रामशेठ सतत घेत असतात.

मला विलासरावांकडून समजले रामशेठ काँग्रेसमध्ये येत आहेत. त्यावेळी मला अत्यंत आनंद झाला. मी त्यांना फोनवर सांगितले की, तुमचे अत्यंत आनंदाने स्वागत होईल, यथायोग्य आदर केला जाईल. तसा त्यांचा आदर केला गेला. रामशेठ काँग्रेसमध्ये यावेत, असे मला वाटले याचे कारण, रामशेठ ही एक राजकीय शक्ती आहे. एका लोकसभा निवडणुकीत त्यांनी माझाही पराभव केला होता. पण त्या पराभवानंतर त्यांच्या मनाच्या दिलदारीचा मला प्रत्यय आला. त्यांनी आपला विजय साजरा करताना माझ्याबद्दल अत्यंत आदराच्या भावना व्यक्त केल्या होत्या. हे मला समजले होते. त्यामुळे रामशेठ ठाकूर ही व्यक्ती केवळ राजकारणी नसून ती व्यक्ती समाजात सर्वधर्मसमभाव जपणारी आहे, याचाही अनुभव मला आला आहे. राजकारणामध्ये जय-पराजय होत असतात. परंतु विजयाने रामशेठ कधी हुरळून गेलेले पाहिले नाहीत आणि एका पराभवाने मीही कधी खचून गेलो नाही. शिवाय, जय-पराजय त्या-त्यावेळचे असतात. राजकीय जीवनातली मैत्री कायम टिकवायची असते. रामशेठ यांनी अशी मैत्री कायमची टिकवलेली आहे. याचा मला आनंद आहे.

**(२ जून २०१३- रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवशी बॅ.अंतुले यांनी व्यक्त केलेल्या भावना)**

*दुर्दैवाने बॅ. अंतुले यांचे दुःखद निधन २ डिसेंबर २०१४ रोजी झाले.*

# कुठलंही पद नसताना मोठा असलेला नेता रामशेठ – स्व. पतंगराव कदम



**एका छोट्या** १० बाय १० च्या खोलीतून शिकवण्यांचे वर्ग सुरु करुन अतिशय जिद्दीने 'भारती विद्यापीठ' निर्माण करणारे स्व. पतंगराव कदम अकाली गेले. पण त्यांच्या शब्दात सांगायचे तर 'रामशेठशी माझा चांगला दोस्ताना आहे...' पतंगराव जाण्यापूर्वी त्यांनी रामशेठ यांच्याबद्दल अतिशय मोकळ्या मनाने आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या.

सांगली-मिरज महापालिका निवडणुकीच्या गडबडीत ते होते. पण रामशेठबद्दल बोलायचं आहे म्हटल्यावर ते म्हणाले, आताच सुरुवात करू.... दहा वर्षांपूर्वी घेतलेली मुलाखत पतंगरावांच्या शब्दाने ओथंबलेली...

'रामशेठबद्दल काय बोलू' हा गडी आमच्या रयत शिक्षण संस्थेचा विद्यार्थी. मी आणि ते आजही रयतमध्ये संचालक मंडळावर आहोत. 'कमवा आणि शिका' या रयत योजनेतून रामशेठ यांनी शिक्षण पुरे केले. गरिबीतले दिवस होते. पण चांगले दिवस आल्यावर रामशेठना गरिबीचा कधी विसर पडला नाही. सुरुवातीच्या काळात शेकापक्षात असलेले रामशेठ कॉंग्रेसमध्ये यावेत, असे मला नेहमी वाटायचं. मी त्यांना विनंती केली होती. आपण कॉंग्रेस पक्षात या. विलासरावही त्यासाठी प्रयत्नशील होते आणि रामशेठ कॉंग्रेसमध्ये आले. साधारणपणे पक्ष सत्तेत असला आणि नवा नेता आला तर तो लगेच पद मागतो, पण रामशेठनी कोणतेही पद मागितले नाही. उलट 'मला पद नको' असं सांगून त्यांनी त्यांच्या मनाचा मोठेपणा दाखवला. त्यामुळे पद नसलेला मोठ्या मनाचा माणूस असंच मी त्यांचं वर्णन करीन.

देशातल्या प्रख्यात अशा रयत शिक्षण संस्थेमध्ये गेली कित्येक वर्षे आम्ही एकत्रित काम करीत आहोत. रामशेठ या संस्थेत शिकले तसे अनेक विद्यार्थी या संस्थेत शिकले आहेत. पण, संस्थेचे ऋण कायमचे मनामध्ये ठेवून रयत शिक्षण संस्थेसाठी रामशेठ यांनी फार मोठा वेळ दिलेला आहे. सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या बैठका होतात. त्या प्रत्येक बैठकीला रामशेठ ठाकूर पनवेलहून येतात. मला अशी एकही बैठक आठवत नाही की, रामशेठ त्या बैठकीला गैरहजर आहेत. स्वतःची गाडी घेऊन ते येतात. सातारा शहरातल्या हॉटेलमध्ये राहतात. रयत शिक्षण संस्थेला एक नव्या पैशांचं बिल रामशेठ यांनी कधी दिलंय, असं आम्ही पाहिलेले नाही. उलट ते 'घेणारे' नसून 'देणारे' नेतृत्व आहे. रयत शिक्षण संस्था आपली मानून रामशेठ या संस्थेसाठी तन-मन आणि धन अशा सर्वस्वाने काम करताना मी पाहिले. ■



# रामशेठ द्रष्टा नेता – स्व.रावसाहेब शिंदे




**जीवनातील** सरलता, मनाची निर्मळता, वैभव असूनही चारित्र्यसंपन्नता आणि सामान्य माणसाबद्दलची दानशूरता... मानवी जीवनातील अतिशय उच्च गुणांचा समावेश असलेले एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून मी रामशेठ यांच्याकडे पाहतो. आयुष्यात
'पद नको' असलेला पण कृतज्ञतेचा भाव मनोमन जपणारा असा आगळा वेगळा नेता म्हणजे रामशेठ आहेत. कोणतीही जाहिरातबाजी न करता सतत काम करणारे म्हणून रामशेठ ठाकूर यांच्याकडे मी पाहतो. माझ्या आयुष्यात त्यांच्यासारख्या व्यक्तिमत्वाची माझी भेट झाली. हे मी माझे संचित समजतो. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श समोर ठेवून आपले जीवन जगणारे रामशेठ यांच्याबद्दल मला अतिशय अभिमान वाटतो.

विपरित परिस्थितीशी संघर्ष करुन रामशेठ यांनी आपले शिक्षण पूर्ण केले आहे. संघर्षाच्या जीवनाला त्यांनी कधी नकार दिला नाही किंवा ते कधीही निराश झालेले नाहीत. 'कमवा आणि शिका' ही कर्मवीर भाऊराव पाटलांची शिकवण होती. या योजनेतून अनेकजण शिकले. अनेकजण मोठे झाले. अनेकांनी लौकिक मिळवला पण, जीवनात लौकिक मिळविल्यावर रामशेठ असे अपवाद आहेत की, मातृसंस्थेबद्दल कृतज्ञतेचा भाव त्यांनी कायम मनात ठेवलेला आहे. त्यामुळे रामशेठ हे कल्पवृक्ष आहेत. कधीही पाहा, कोणालाही मदत करायला हा माणूस तत्पर आहे. अचंबा वाटणारे असे हे व्यक्तिमत्व आहे.

राजकारणात आज चारित्र्यनिष्ठा लयाला गेलेली आहे. पण, रामशेठ ठाकूर यांच्याकडे तत्वनिष्ठा, चारित्र्यनिष्ठा व समाजनिष्ठा या तीनही गुणांचा संगम झालेला आहे. या व्यक्तिमत्वाला कधीही गर्व आहे, असं वाटत नाही. हा निर्मळ मनाचा माणूस आहे. आमच्या रयत शिक्षण संस्थेला मदत करायला हा माणूस नेहमी तत्पर आहे. 'मी जो आज काही आहे, तो रयत शिक्षण संस्थेमुळे आहे' हे रामशेठ यांच्या तोंडून जे उद्‌गार निघतात, हे त्यांच्या कृतज्ञ जीवनाचे सार आहे, यामुळे या व्यक्तीचा गौरव कसा करू आणि किती करू, असे मला नेहमी वाटत राहते.

एकच प्रसंग सांगतो. संगणकीय क्रांती झाली, तेव्हा रयतमधले विद्यार्थी जगाच्या स्पर्धेत मागे पडू नये म्हणून रयत शिक्षण संस्थेत संगणकीय शिक्षणाचा प्रस्ताव आम्ही मांडला. पवारसाहेबांकडे पाठवला. १२ कोटी रुपयांचा प्रस्ताव होता. श्री. विवेक सावंत या संगणकतज्ज्ञाने हा प्रस्ताव दिला. श्री. पवारसाहेबांनी बैठक बोलावली, त्या बैठकीला १२ लोकांना बोलावले. अजितदादा, सुप्रियाताई, पतंगराव, रामशेठ आणि अन्य काही मंडळी होती. त्या १२ जणांपैकी प्रत्येकाला १-१ कोटी रुपयांची व्यवस्था करायला सांगितली. मला अभिमान वाटतो की, या मोठ्या प्रकल्पाला एक कोटी रुपयांच्या देणगीने रामशेठचाही हात लागला. आज संगणक शिक्षण रयतमध्ये अग्रगण्य आहे. त्याचे श्रेय इतर ११ देणगीदारांप्रमाणे रामशेठनाही आहे.रामशेठना मी द्रष्टा नेताच मानतो. ■



## फ्लॅशबॅक

उमद्या मनाचे राजीव सातव महाराष्ट्र युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष असताना पनवेलला रामशेठ ठाकूर यांच्या घरी आले होते. त्यावेळी रायगड जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष श्री. प्रशांत ठाकूर यांनी आणि श्री. रामशेठ यांनी त्यांचे मनस्वी स्वागत केले. श्री. प्रशांत ठाकूर यांच्याशी श्री राजीव सातव यांची विशेष मैत्री होती. श्री. रामशेठ ठाकूर यांना राजीव सातव 'काका' या प्रेमळ नावाने हाक मारायचे.

राजीव सातव यांच्या दुःखद निधनाने ठाकूर परिवारातील जिव्हाळ्याचे कोणीतरी आपण गमावलं अशीच भावना रामशेठ ठाकूर यांनी तीव्रतेने व्यक्त केली. राजीव सातव पनवेलला आले असताना रामशेठ यांच्या घरीच त्यांचं असं स्वागत झालं होतं. आता राहिल्यात आठवणी.



।। मातृदेवो भव ।।



स्व.भागूबाई चांगू ठाकूर

।। पितृदेवो भव ।।



स्व. चांगू काना ठाकूर



पितृतुल्य - जनार्दन भगत साहेब

# संपादकीय

# रामशेठ... जसे भावले तसे

**पत्रकारितेमध्ये** संपादक म्हणून काम करताना एक वेगळा आनंद असतो. संपादकीय लिहिताना त्याहून वेगळा. काही व्यक्तींवर संपादकीय लिहिताना मनापासून आनंद वाटत असतो. या व्यक्तीचं मोठेपणं नेमक्या शब्दात उभं करता आलं तर त्या व्यक्तिमत्वाची प्रतिमा समाजात जशी आहे तशीच्या तशी उभी राहते. आज रामशेठ ठाकूर यांच्यावर संपादकीय लिहिताना हाच मनस्वी आनंद आहे. एक साधा सरळ आणि मनानं निर्मळ असलेला अशी रामशेठ यांची प्रतिमा आहे. त्यांच्या सहवासात जे-जे आले, त्या-त्या प्रत्येकाला त्यांच्या नावातील 'राम' सातत्याने जाणवलेला आहे. त्यामुळेच रामशेठ 'माणूस' म्हणून त्यांचं मोठेपण फार मोठं आहे. श्रीमंत, धनवंत आणि कुबेर असतात आणि आहेत. खूप लांबून ती माणसं मोठी वाटतात पण त्यांच्याजवळ गेल्यावर ती मनाने, त्यांच्या कामातून खूप छोटी असल्याचे अनुभव येतात. रामशेठ ठाकूर हे व्यक्तिमत्व असे आहे की, त्यांचे बोलणे, त्यांचे वागणे जीवनातला सहजपणा, सामान्य माणसांना सहजपणे मदत करण्याची त्यांची हातोटी. हे सगळे विलक्षण आहे. 'रामशेठ चिडले', 'रामशेठ रागावले', 'रामशेठ कुणाला टाकून बोलले' असे सांगणारे कोणी भेटत नाहीत. आयुष्यात नशिबानं मोठी झालेली माणसं खूप आहेत. त्याचप्रमाणे कष्टाने मोठी झालेली माणसंही खूप आहेत. पण एकदा हे मोठेपण चिकटलं की, हवेत चालणारी माणसंही खूप आहेत. हे मोठेपण आलं, श्रीमंती आली की त्यांचे पोशाख बदलतात, त्यांची जीवन पध्दती बदलते. समाजाकरिता त्यांचा हात 'देणारा' राहत नाही. श्री. रामशेठ ठाकूर यांचे मोठेपणा इथं जाणवू लागतं. गरिबीवर मात करुन त्या चटक्याची कुठेही वाच्यता न करता, रामशेठच्या वडिलांनी त्यांना शिक्षणाचा आग्रह धरला. रामशेठ अशा संस्थेत शिकले की, एका शहाण्या माणसाने महाराष्ट्राला शहाणं करुन सोडण्याकरिता ही संस्था म्हणजे महाराष्ट्राची ख्यातनाम रयत शिक्षण संस्था, रामशेठ त्या रयतचे विद्यार्थी. त्यामुळे कर्मवीर भाऊरावांचा साधेपणा आणि 'देता देता इतुके द्यावे', हा संस्कार रामशेठ यांच्यावर मनावर प्रभावीपणे बिंबला. रामशेठ यांच्या आयुष्याच्या पुस्तकाची मुळाक्षरे रयत शिक्षण संस्थेत गिरवली गेली आहेत, त्यामुळे सार्वजनिक जीवनात वावरताना रामशेठ यांनी माणूसपण कधीच सोडलं नाही.

रामशेठ दोनदा खासदार होते. त्यानंतर ते प्रत्यक्ष राजकारणापासून दूर राहिले, स्वतःसाठी पद घ्यायचं नाही त्यांनी ठरवून टाकलं. अनेक प्रलोभनं आली, अशावेळी आपल्या निर्णयावर ठामं राहणं ही सोपी गोष्ट नसते. राजकारण करताना पदं घ्यायचं नाही, हे कितीजणांना जमणार? पण रामशेठंनी ते करुन दाखवलं. राजकारण आणि समाजकारण हातात हात


घालून चालत हेही त्यांनी दाखवून दिलं. हे करत असताना आपण ज्या परिस्थितीतून आलो त्याची जाणीव कायम ठेवणं आणि त्यानुसार अनेक विद्यार्थ्यांना मदतं करणं ही सोपी गोष्ट नाही. रामशेठनी किती विद्यार्थ्यांची वार्षिक फी माफ केली आहे, याची गणती नाही. त्यांचा भरलेला खिसा संध्याकाळपर्यंत रिता केल्याशिवाय त्यांना समाधान नाही. त्यांच्यासोबत परवा त्यांच्या मूळ जन्मगावी गेलो होतो न्हावाखाडीला. आजूबाजूच्या घरातून एक म्हातारी मावशी रामशेठ यांच्यासमोर आली. खिशात हात घालून हाताला जेवढे पैसे लागले तेवढे त्यांनी त्या मावशीच्या हातावर ठेवले. एरव्ही एखाद्या पुढाऱ्याने ते पैसे देत असताना आपला फोटो काढून घेतला असता आणि त्याची प्रसिध्दी केली असती. रामशेठ यांच्या मनात असला विचार कधीच येत नाही. एकदा त्यांना विचारले होते की... तुमच्या या देण्यामागे तुमची काय भावना आहे? रामशेठ यांनी सोपं उत्तर दिलं... 'अहो, माझ्याजवळ होतं काय, परमेश्वराच्या कृपेने, जनतेच्या आशीर्वादाने जे मिळाले ते जनतेलाच वाटतो आहे.

आपलं डबोलं थोडंच कोणी वर घेऊन जातो?' राजकारणात 'कमावणारी' खूप माणसं ६० वर्षाच्या पत्रकारितेत पाहिली. आपल्या कष्टाच्या कमाईतले पैसे सामान्य माणसाला सहजपणे देणारे पाहायचे असतील तर रामशेठजवळ येऊन थांबावं लागेल.

रामशेठ यांच्याजवळ काही उपजत गुण आहेत. ते बी.ए. आहेत. म्हणजे ते शिकलेले आहेत, ते बी.एड. आहेत म्हणजे त्यांना शिकवता येतं. पण त्याचवेळी जीवनाचे ते भाष्यकार आहेत आणि उत्तम नगररचनाकार आहेत. त्यांनी उभे केलेले क्रीडासंकुल पाहिले की, भलेभले आर्किटेक्ट थक्क होऊन जातील, अशा आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडासंकुल त्यांनी उभे करुन दाखवले. अवघ्या दोन वर्षात ते संकुल उभे राहिले.

रामशेठचे आणखी काही गुणविशेष आहेत. दिवस-रात्रीच्या २४ तासांतील १५ ते १६ तास त्यांनी लोकांना दिले आहेत. सकाळी ७ वाजल्यापासून त्यांच्याकडे गर्दी जमते. त्या प्रत्येकाला भेटायचं असतं, काही सांगायचं असतं, रामशेठ कधी एकटे चहा प्यायले, नाश्ता केला, एकटे जेवले, असं कधी घडलं नाही. दोन, पाचजण बरोबर असल्याशिवाय त्यांना घशाखाली घास जात नाही. पुणे, नाशिक, सातारा... ते कुठेही गेले तरी त्यांच्यासोबत पाच-दहा लोक असल्याशिवाय ते जात नाहीत. एवढेच नव्हे तर परदेशात जातानासुध्दा पाच-पंचवीस मित्रांचा काफिला असल्याशिवाय त्यांचा परदेश दौरा यशस्वी होत नाही.

रामशेठ जग पाहून आले. जगात जे चांगलं आहे, ते त्यांनी आपल्या संस्थात आणले, पण त्यांचा वेश बदलला नाही त्यांच्या पायातली चप्पल बदलली नाही, असे हे रामशेठ दिसायला व्यक्ती एक पण माणुसकीच्या अनेक रुपांतून त्यांच्या जीवनाचे अष्टपैलू गुणविशेष हे त्यांचे जीवन सामर्थ्य आहे.



- मधुकर भावे

(मो. ९८६९२३९९७७ / ९८९२०३३४५८)

# ...शून्यातून विश्व उभे करणारे रामशेठ



## श्री. शरद पवार
**खासदार आणि देशाचे ज्येष्ठ नेते**


**श्री. रामशेठ ठाकूर** हे राजकारणात यशस्वी झाले आहेत. ते दोन्ही निवडणुकीत निवडून आले. त्यांच्या सुपुत्राच्या निवडणुकीत ३ वेळा विजय मिळवला. राजकारणात हे यश आहे. पण, मी असे मानत आलो आहे की, हा कार्यकर्ता-नेता राजकारणी नाही. तो सर्वार्थाने समाजकारणी आणि दुसऱ्या अर्थाने कृतज्ञ नेता आहे. शिक्षण क्षेत्रात त्यांचे योगदान फार मोठं आहे. आमच्या रयत शिक्षण संस्थेत रामशेठ हे आमचे सहकारीच नव्हे तर, 'जिथं कमी तिथे रामशेठ' अशी आमच्या संस्थेची स्थिती आहे. आम्ही सांगावं आणि रामशेठ यांनी काम पार पाडावं, अशी किती तरी कामं मी दाखवू शकेन. खुद्द साताऱ्यातील रयत शिक्षण संस्थेच्या शिवाजी महाविद्यालयातील आवारात एक भव्य इमारत रामशेठ स्वतः बांधून देत आहेत. इमारत हवी होती आमच्या शिवाजी महाविद्यालयाला. त्याची पूर्ण जबाबदारी रामशेठ यांनी घेतली. मग आम्ही सर्वांनी त्या इमारतीला 'रामशेठ ठाकूर भवन' हे नाव द्यायचं ठरवलं.

मी असा विचार करत असतो की, रामशेठ हा सेवाव्रती माणूस आहे. त्यांनी जेवढ्या देणग्या दिल्या, त्या देणग्यांमध्ये त्यांच्या स्वतःच्या शिक्षण संस्थांच्या कितीतरी इमारती उभ्या राहिल्या असत्या. कष्टाने मिळविलेला पैसा सामाजिक कामासाठी देणं हे नुसतं दातृत्व हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. यामुळे रामशेठ हे असे विरळ अपवाद असलेले नेते आहेत, त्यांच्याकडे आलेला कोणताही माणूस रिकाम्या हाताने जात नाही. याकरिता मनाचा एक मोठेपणा लागतो. कार्यकर्ते जेव्हा जीव लावतात, तेव्हा त्या नेत्याचं मन ते समजून घेत असतात. नेत्याला कार्यकर्त्यांच्या भावना समजल्या पाहिजे. रामशेठना त्या नेमक्या समजल्या आहेत.

आमच्या रयतला रामशेठ ठाकूर एक आधार वाटतात. रयतमध्ये संगणकीय क्रांती करताना १२ कोटी रुपयांच्या प्रकल्पाची व्यवस्था करायची होती. विषय मोठा होता. मी बैठक घेतली. १२ लोकांना बोलावलं. मला खात्री होती की, ही सगळी मंडळी योगदान देऊ शकतील आणि ग्रामीण विद्यार्थ्यांना संगणकीय क्रांतीचं शिक्षण देण्यात सगळे मदत करतील. बैठकीची सुरुवात रामशेठ यांच्यापासूनच केली आणि १२ मिनिटांत १२ कोटी रुपये उभे राहिले. आज रयतची संगणकीय क्रांती रामशेठ यांच्या पहिल्या देणगीतून निर्माण झालेली आहे. त्यांना संस्थेबद्दल आत्मियता आहे. संस्थेचे संस्थापक भाऊरावअण्णा यांच्याबद्दल त्यांना अपार श्रध्दा आहे. शिवाय, याच संस्थेत ते शिकलेले आहेत आणि सगळ्यात महत्वाचं हेच आहे की, ज्या परिस्थितीतून ते शिकले, त्याची त्यांना पूर्ण जाणीव आहे. ही जाणीव ठेवणे हेही फार मोठ्या मनाचे लक्षण आहे. म्हणून रामशेठ सर्वार्थाने मोठे आहेत. त्यांना माझ्या शुभेच्छा.

■

# रामशेठ : आधारस्तंभ आणि दीपस्तंभसुद्धा....



श्री. नितीन गडकरी
केंद्रीय मंत्री

**रायगड** जिल्हा आणि परिसरात सामाजिक व शैक्षणिक संस्थांच्या स्वरुपात मोठे काम उभे करणारे लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर २ जून २०२१ रोजी वयाची सत्तरी पूर्ण करीत आहेत. बालपणापासून अपार कष्ट श्री. ठाकूर यांच्या वाट्याला आले. अशा पार्श्वभूमीतून आलेल्यांच्या ठायी काही वेळा आक्रस्ताळेपणा व आक्रमकता जन्माला येते. श्री. ठाकूर यांच्या व्यक्तिमत्त्वात प्रसन्न शांतता व ऋजुता आहे. पद असो वा नसो, ते सातत्याने स्थानिकांच्या, शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहिले. रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजनेंतर्गत त्यांचे शिक्षण झालेले असल्याने त्यांना एकूणच शैक्षणिक प्रक्रियेबद्दल आणि तिच्या फलिताबद्दल अत्यंत आस्था आहे. त्याच आस्थेपोटी त्यांनी रायगड जिल्ह्यात शैक्षणिक संस्थांचे जाळे निर्माण केले. त्या संस्थांमध्ये शिकणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांचे पालक म्हणून श्री. रामशेठ ठाकूर अद्वितीय असे कार्य करीत आहेत. शिक्षकी पेशा व नंतर छोट्या-छोट्या कामांतून कष्ट करीत वर आलेले आणि पुढे लोकनेते म्हणून मान्यता पावलेले श्री. ठाकूर यांनी लोकसभेचे सदस्य म्हणून उत्तम कामगिरी बजावली आहे. रायगड जिल्ह्यात त्यांच्या नेतृत्वात व आग्रहाने झालेली अनेक विकासकामे त्यांच्या कारकिर्दीची साक्ष देणारी आहेत. त्यांच्या एकूण सामाजिक जीवनाचे सूत्र ८० टक्के समाजकारण आणि फक्त २० टक्के राजकारण हे आहे. सामान्यांच्या मदतीला धावून जाणारे व दातृत्व असलेले रामशेठ हा त्या भागातील जनतेसाठी मोठा आधार आहे. गेले वर्षभर कोरोनाच्या काळात श्री. ठाकूर यांनी गरजूंना केलेल्या मदतीबद्दल मला कल्पना आहे. मी त्यांच्या या कार्याला अभिवादन करतो. अन्नधान्याचे वाटप असो वा अन्य कोणतीही मदत असो, श्री. ठाकूर यांनी लोकांना मदत करण्याच्या बाबतीत नेहमीच अतिशय सकारात्मक व सहृदय भूमिका घेतलेली आहे. ते माणसांत आणि माणुसकीत रमतात. भवतालातील समस्यांशी एकरूप होतात.

मुंबईला लागून असलेल्या पनवेलमध्ये कोरोनाचे संकट आलेले असताना शहर व परिसरातील नागरिकांना मदतीचा हात देणारे श्री. रामशेठ ठाकूर हा लोकप्रतिनिधींसाठी आदर्श आहे, असे मी मानतो. मदत करताना कोणत्याही प्रकारचा आप-पर भाव त्यांच्या मनात नसतो. समस्याग्रस्त लोकांसाठी संघर्ष करणे आणि गरजूंना मदत करणे, हा त्यांच्या पिंडाचा भाग आहे. अशी माणसं समाजासाठी एखाद्या आधारस्तंभासारखी व दीपस्तंभासारखी असतात. त्यांचे व्यक्तिमत्त्व व कार्य दोन्ही आश्वासक आहेत. एक थोर लोकसेवक व लोकनेता सत्तरी पूर्ण करून तारुण्यालाही लाजवेल अशा सळसळत्या ऊर्जेसह कार्यरत असणे ही त्यांच्या समस्त चाहत्यांसाठी, कार्यकर्त्यांसाठी आनंदाची व भाग्याची गोष्ट आहे.

रामशेठ यांच्याबद्दलचा आदर यामुळेही अधिक आहे की, पनवेलमध्ये आलेला महापूर असो किंवा आताची महाभयानक महामारी कोरोनाची साथ असो, या संकटकाळात रामशेठ आणि त्यांचे दोन्ही सुपुत्र घरात बसले नाहीत. १५ वर्षांपूर्वीच्या महापुरात त्यांनी केलेले मदतकार्य मला माहिती आहे. त्यावेळी ते खासदारही नव्हते आणि प्रशांत आमदारही नव्हता. पदासाठी रामशेठ यांनी काही केलेले नाही. आताही कोरोनाच्या संकटकाळात मला अशी माहिती मिळाली की, ३ कोटी रुपयांपर्यंतची विविध स्वरुपाची मदत रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना रामशेठ यांनी अतिशय शिस्तबध्द रीतीने पुरवलेली आहे. मी श्री. रामशेठ ठाकूर यांना लोकसेवेसाठी ईश्वराने उदंड आयुष्य आणि आरोग्य द्यावे, अशी प्रार्थना करतो. ■

# उमद्या मनाचे माझे सहकारी रामशेठ – प्रा. एन.डी. पाटील





महाराष्ट्राच्या डाव्या राजकारणाचे भीष्माचार्य, लढाऊ नेते प्रा. एन.डी. पाटील आज ९३ व्या वर्षी कडाडून लिहीत आहेत. 'माझी संघर्ष यात्रा' हे एन.डी. पाटील यांचे आत्मकथन असलेले पुस्तक कोल्हापूरच्या 'विजिगीषा' प्रकाशन संस्थेने नुकतेच प्रसिध्द केले आहे. या पुस्तकात पान ५५ वर 'रयत शिक्षण संस्थेचा वटवृक्ष' या लेखात ६० आणि ६१ पानावर प्रा. एन.डी. पाटील यांनी रामशेठ ठाकूर यांच्याबद्दल जे लिहिले आहे, ते त्यांच्याच शब्दात जसे न् तसे येथे दिले आहे.' ('माझी संघर्षयात्रा' ग्रंथामधून साभार)

**सामाजिक क्षेत्रात** मी आणि रामशेठ ठाकूर असं दोघांनी दीर्घकाळ एकत्र काम केलं. विशेषतः रयत शिक्षण संस्था आणि शेतकरी कामगार पक्ष या दोन्ही ठिकाणी रामशेठ ठाकूर हे माझे सहकारी होते. अत्यंत उमद्या मनाचा दिलदार आणि दानशूर असलेला हा माझा सहकारी लोकसभेवरही निवडून गेला. शिक्षण, सहकार, उद्योग, शेती अशा विविध क्षेत्रांत त्यांनी उत्तम काम केलं. अलीकडच्या काळात राजकीय क्षेत्रातील मंडळीही फायद्या-तोट्याचा विचार करून लोकांना मदत करीत असतात. रामशेठ ठाकूर हे त्याला अपवाद आहेत. दानशूरपणाचा मानदंड म्हणून पाहावं असं त्यांचं व्यक्तिमत्त्व आहे. सामाजिक काम असो किंवा कुणाची व्यक्तिगत अडीअडचण, रामशेठ ठाकूर यांचा अनेकांना आधार वाटतो. अशी माणसं समाजात दुर्मिळ असतात. त्यांची काही राजकीय मजबुरी असेल, परंतु नंतरच्या काळात आमच्या राजकीय वाटा वेगळ्या झाल्या. मात्र, आमच्यातला जिव्हाळा कमी झाला नाही. शिक्षण आणि राजकीय क्षेत्रात माझ्यासोबत काम करणाऱ्यांमध्ये आवर्जून उल्लेख करावा, असे आमचे जिव्हाळ्याचे संबंध होते. ■

# रामशेठ, पुढच्या जन्मात तुमच्या खारघरच्या शाळेत मी ॲडमिशन घेईन – चंद्रकांत पाटील





**'रामशेठ,** तुमच्या शिक्षण संस्था इतक्या अप्रतिम आहेत. त्या पाहत असताना माझ्या मनात एक विचार आला. या संस्थांमध्ये आता प्रवेश घेऊन शिकणे शक्य नाही. मग मी मनातच म्हणालो की, 'देवा, पुढचा जन्म देशील तेव्हा रामशेठ ठाकूर यांच्या खारघर येथील पब्लिक स्कूलमध्ये मी ॲडमिशन घेईन.'... हे मनापासून उद्‌गार आहेत. महाराष्ट्र भाजपाचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत पाटील यांचे.

त्याचे असे झाले की, रामशेठ ठाकूर यांचे शैक्षणिक पाहणीकरिता श्री. चंद्रकांत पाटील यांचा नवी मुंबईत दौरा होता. त्याचवेळी दुपारी रामशेठ ठाकूर यांच्या खारघर येथील पब्लिक स्कूलमध्ये सर्व मान्यवर मंडळी आली होती. त्याचवेळी श्री. पाटील यांनी रामशेठ ठाकूर यांच्या दोन्ही-तिन्ही शिक्षण संस्था अत्यंत आत्मियतेने पाहिल्या. त्या संस्थांमधील सुविधा पाहिल्यानंतर रामशेठ ठाकूर यांचे शैक्षणिक संकुल अद्ययावत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यानंतर खारघर येथील पब्लिक स्कूलला भेट दिली असताना तेथील शैक्षणिक व्यवस्था बघून श्री. चंद्रकांत पाटील अगदी भारावून गेले. त्यांना त्यांचे शालेय जीवन आठवले आणि रामशेठ यांच्याशी बोलताना ते सहजपणे म्हणाले, 'आता काही मला शाळेत दाखल होता येणार नाही, पुढच्या जन्मात तुमच्या शाळेतच ॲडमिशन घेईन.'

■





# ज्यांच्या नावातच राम आहे, त्यांना काय कमी?

– देवेंद्र फडणवीस

विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा

**संकटाच्या** काळात जी व्यक्ती मदतीला धावून येते, तिच्याबद्दल लोकभावना कायम निर्मळ असते, कारण, त्या व्यक्तीचे सामाजिक आणि कौटुंबिक नाते घराघरात तयार होते. माजी खासदार रामशेठ ठाकूर यांचेही असंच नातं निर्माण झाले आहे. म्हणूनच ते लोकनेते झाले. पक्षविरहीत काम करणे हेच त्यांचे ब्रीद असल्याने त्यांना कार्य करण्याची अलौकिक ऊर्जा मिळते. गेली अनेक वर्षे राजकारण, समाजकारण करणारे रामशेठ ठाकूरजी त्यांच्या वयाची ७० वर्षे पूर्ण करत आहेत. त्यांचा उत्साह आणि नाविन्याची गोडी लक्षात घेऊन त्यांच्या वयाचा सर्वांना विसर पडतो. काही व्यक्तीमत्वाची ऊर्जाच अशी असते की, ज्यामुळे कित्येकांची आयुष्ये उजळून निघतात. रामशेठ ठाकूर यांच्या व्यक्तीमत्वात हा विलक्षण गुण आहे. ज्यामुळे जीव ओतून काम करणारी पिढी ते घडवू शकले. कार्यकर्त्यांची मोठी आणि मजबूत फळी त्यांच्यामुळे निर्माण झाली. राजकारण म्हणा की समाजकारण या दोन्ही क्षेत्रात खंबीर आणि जिवलग कार्यकर्ते असावे लागतात. ठाकूरजींच्या विश्वासाने ते तयार झाले.

दोन वेळा संसदेत प्रतिनिधीत्व केलेल्या रामशेठ ठाकूर यांनी कितीतरी प्रश्नांचे पालकत्व घेतले. कितीतरी शिक्षण संस्था आणि त्यातील विद्यार्थी, आपल्या आयुष्यातील ४० वर्ष त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष केला. अतिशय हलाखीच्या स्थितीत बालपण घालविलेली एक व्यक्तीच समाजासाठी अशा आधारवडाच्या भूमिकेत राहू शकते. कोकणाच्या विकासाचा त्यांचा ध्यास तर सर्वश्रूत आहेच.

गेली अनेक वर्षे ते जनतेच्या लहान-मोठया प्रश्नांकडे बारकाईने लक्ष देतात. कोरोनाच्या संकटातही जनतेच्या पाठीशी खंबीरपणे ते उभे आहेत. 'लॉकडाऊन'मध्ये हातावर पोट असलेल्या अनेकांची उपजीविका अडचणीत आली, त्यावेळी रामशेठ धावून आले. त्यांच्या समाजसेवेची दखल राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी घेतली. राज्यपालांनी त्यांना 'कोरोना देवदूत' पुरस्कारानेही सन्मान केला.

सध्याच्या काळात धीर, दिलासा आणि मदत या त्रिसूत्रांनी निराशेच्या गर्तेत सापडलेल्या अनेक कुटुंबांचा आधार रामशेठ बनले. त्यांचा आजवरचा समाजसेवेचा आलेख त्यांनी समाजसेवेचा वसा घेतल्याने विस्तीर्ण आहे. राजकीय व्यक्तींची दखल समाज नक्की घेत असतो. धडाडी, समर्पण आणि लोकाभिमुखतेबाबत मूल्यमापन समाज करत असतो. त्यांच्या आजवरच्या कार्यावरुन मला असे जाणवते की, रामशेठजी कर्मसिध्दांताचे उपासक आहेत. त्यामुळे, त्यांच्या हातून समाजसेवा, देशसेवा अशीच अविरत सुरु राहो, अशा शुभेच्छा देतो.

काही व्यक्तिमत्व जनतेच्या मनात घर करुन असतात. रामशेठ ठाकूर हेही त्याच श्रृंखलेतील आहेत. खरं तर ज्यांच्या नावातच राम आहे, त्यांना काय कमी पडावे ? रामशेठजींना मी दीर्घ, निरामय आणि सुंदर आयुष्य लाभावे, शुभकामना देतो. ■



देवेंद्र फडणवीस

# रामशेठ : कार्यकर्त्यांच्या मागील खंबीर शक्ती..



श्री .महेश बालदी
आमदार, उरण

रायगड जिल्ह्याचे माजी खासदार, लोकनेते सन्माननीय रामशेठ ठाकूर साहेबांचा वाढदिवस हा माझ्यासारख्या त्यांच्यावर श्रद्धा, निष्ठा आणि विश्वास ठेवणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांकरिता उत्साह देणारा दिवस आहे.

राजकारणात, केंद्रात, राज्यात अनेक सहकारी बघितले, अनेक सत्ता पाहिल्या, परंतु लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासारखा दिलदार व्यक्तिमत्त्वाचा नेता मी माझ्या आयुष्यात पहिला नाही. कायम समाजाचे भले करता येईल आणि या समाजाचे मी काहीतरी ऋण देणे बाकी आहे म्हणून निष्काम भावनेने सतत मनमोकळेपणाने काम करणारा हा लोकनेता आहे. समाजात श्रीमंत बरेच जण आहेत, पण मनाने श्रीमंत असणारे फार थोडे असतात. त्यापैकी एक रामशेठ ठाकूर साहेब आहेत. समाजाकरिता माझे ऋण आहे; मग त्यांचे जन्मगाव असो, कर्मभूमी असो, ज्या शाळेत शिकलेले असो, ज्या संस्थेत शिकलेले असो किंवा एखादी आपली संस्था मोठी करावयाची असेल, त्याच्याकरिता काही कमी पडत असेल तर समर्पण भावनेने ते पुढे सरसावतात. असे हे हिमालयासारखे उत्तुंग व्यक्तिमत्त्व आमच्यासारख्या कार्यकर्त्यांच्या मागे खंबीरपणे उभे असते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शुभ चिंततो आणि अशीच माया आमच्यावर राहो, त्यांचे कार्य असेच उत्तुंग राहो, त्यांना दीर्घायुष्य मिळो ही परमेश्वरचरणी प्रार्थना करतो. ■

---

# प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व रामशेठ ठाकूर



श्री . बबनराव पाटील
सल्लागार, रायगड जिल्हा शिवसेना

**माजी** खासदार रामशेठ ठाकूर हे दानशूर आणि संयमी व्यक्तिमत्त्व आहे. समाजात त्यांना एक मोठे स्थान आहे. सर्वांना सोबत घेऊन पुढे जाणारे रामशेठ ठाकूर यशस्वी राजकारणी, यशस्वी उद्योजक असून शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे भरीव कार्य आहे. त्यांनी उभारलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेत हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. रामशेठ ठाकूर यांचे सामाजिक कार्यदेखील उत्तुंग आहे. अनेक कुटुंबांची उपजिविका आज त्यांच्यामुळे चालत आहेत. या वयातही तरुणालाही लाजवेल असे त्यांचे कार्य पहावयास मिळते. अशा या व्यक्तिमत्त्वाकडून सर्वांनी प्रेरणा घेणे आवश्यक आहे. त्यांच्या हातून समाजाची सेवा अशीच घडत राहो ही पाटील कुटुंबीय व माझ्या शैक्षणिक संस्थेकडून त्यांना ७० व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा! ■



# मातीशी इमान राखणारा नेता रामशेठ – प्रविण दरेकर

विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद

**मी भाजपचा** रायगड जिल्हा संपर्कप्रमुख होतो, त्या काळात माजी खासदार, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सामाजिक आणि पक्षीय काम जवळून बघण्याचे भाग्य मला लाभले. ते बघितल्यानंतर एक विचार माझ्या मनात पक्का झाला की, प्रसिद्धीपासून लांब राहून, गरजूंना मदत करण्यासाठी धावून जाणाऱ्या, लोकांच्या सुख-दुःखात त्यांच्याबरोबर असणाऱ्या आणि सतत लोकांची चिंता करणाऱ्या रामशेठ ठाकूर यांना लोकांनी 'लोकनेता' हा आपुलकीचा किताब स्वतःहून बहाल केला आहे.

रामशेठ ठाकूर यांची आपल्या मातीशी, येथील जनतेशी, समाजाशी नाळ घट्ट जुळलेली आहे आणि म्हणून ज्या ज्या वेळी समाजावर अन्याय झाला, त्या वेळी रामशेठ ठाकूर सर्वात पुढे होते. या समाजाचे ऋण म्हणून दोन्ही हातांनी भरभरून देण्याचे व्रत त्यांनी आजतागायत सुरू ठेवलेले आहे. असे असले तरी त्यांचे नेतृत्व तेवढ्यापुरतेच मर्यादित राहिले नाही. शैक्षणिक, कला, क्रीडा, कामगार आणि सांस्कृतिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्यही तेवढेच महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रात एक जुनी, नावलौकिक मिळवलेली संस्था म्हणून रयत शिक्षण संस्थेकडे पाहिले जाते. रयत शिक्षण संस्थेशी ते जोडलेले राहिले. त्यांनी सातत्याने या संस्थेला मदतीचा हात दिला आणि रयत शिक्षण संस्थेला 'मातृसंस्था' मानून त्यांनी शिक्षण क्षेत्रातील आपले कार्य पुढे नेले आहे. आज रायगड जिल्ह्यात बालवाडीपासून ते पदवी, मॅनेजमेंटपर्यंत दर्जेदार शिक्षण देणाऱ्या संस्था त्यांच्यामुळेच उभ्या राहू शकल्या. त्यांची स्वतःची 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था'ही नावारूपास आलेली आहे.

खेळाडूंना प्रशिक्षण देताना निर्माण होणाऱ्या गैरसोयींची दखल घेऊन रायगड जिल्ह्यात अत्याधुनिक स्वरूपाचे आंतरराष्ट्रीय क्रीडासंकुल तयार करण्याचे स्वप्न रामशेठ ठाकूर यांनी पाहिले आणि पूर्णही केले. उलवे नोडमध्ये ६७ हजार चौरस मीटर एवढ्या विस्तीर्ण जागेवर उभे राहिलेले भव्य क्रीडासंकुल या परिसरातील खेळाडूंना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिलेली भेटच आहे. आज या क्रीडा संकुलात आंतरराष्ट्रीय स्पर्धा भरवल्या जातात आणि अनेक खेळाडूंना प्रशिक्षणही दिले जात आहे. कोणतेही काम करीत असताना तरुणांच्या हाताला काम मिळाले पाहिजे, हा त्यांचा ध्यास असतो. त्यांच्या माध्यमातून लाखो तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. रायगड जिल्हा हा मुंबईला लागून असल्यामुळे साहजिकच औद्योगिकदृष्ट्या रायगड जिल्ह्याचा विकास झपाट्याने झाला आणि हे होत असताना भूमिपुत्रांच्या वेगवेगळ्या समस्याही अनेकवेळा निर्माण झाल्या. सिडकोसाठी जमीन अधिग्रहण असेल, उद्योगांसाठीचे भूसंपादन असेल, नागरी सुविधांचा प्रश्न असेल, नगर नियोजनात भूमिपुत्रांच्या हक्काचा लढा असेल, उद्योगांमध्ये स्थानिकांना नोकरीच्या संधी असतील, अशा प्रत्येक प्रश्नाला वाचा फोडण्यात आणि प्रकल्पग्रस्तांना न्याय्य हक्क मिळवून देण्यात रामशेठ ठाकूर या लोकनेत्याचा सिंहाचा वाटा आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

मला आठवतं, राम मंदिराच्या उभारणीसाठी निधी गोळा करण्याचे अभियान सुरू झाले होते. त्या वेळी ज्यांच्या नावातच 'राम' आहे अशा या दानशूर नेत्याने मंदिर निर्माणाच्या महान कार्यासाठी एक कोटी रुपयांची देणगी दिली.

कोरोनाचा गेल्या वर्ष-दीड वर्षातील काळ आपण सर्वच अनुभवतो आहोत. अनेकांचे व्यवसाय ठप्प झाले, रोजगार बुडाला, उत्पन्न थांबले, हातातोंडाशी गाठ पडणे कठीण झाले. अशा संकटसमयी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जनसेवेचा एक आदर्शच घालून दिला. सर्व छोटे व्यावसायिक, गरीब, मजूर, कामगार यांना कोरोनाकाळात आधार दिला, तो रामशेठ ठाकूर यांनी. हजारो लोकांना त्यांनी या काळात आसरा दिला, लक्षावधी लोकांना दोनवेळचे जेवण दिले, जनतेच्या आरोग्यरक्षणासाठी लाखो रुपयेही खर्च केले.

मला याचाही अभिमान आहे की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या पावलावर पाऊल टाकून त्यांचा सामाजिक बांधिलकीचा घेतलेला वसा त्यांचे सुपुत्र आमदार प्रशांत ठाकूर हे तेवढ्याच प्रामाणिकपणे पुढे नेत आहेत. या कठीण काळात त्यांच्या प्रयत्नाने रायगड जिल्ह्यात श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने मदतीचा ओघ अविरत सुरू आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कामाचा परीघ एवढा मोठा आहे की, एखाद्या लेखात हे काम बंदिस्त करणे अशक्य कोटीतील काम आहे, त्यांना शुभेच्छा!

■






## सौ. सरोजताई एन.डी. पाटील

**सौ. सरोजताई एन.डी. पाटील या केवळ गृहिणी नाहीत. महाराष्ट्राचे राजकीय भीष्माचार्य प्रा. एन.डी. पाटील यांच्या त्या सुविद्य पत्नी आहेत. विलेपार्लेच्या शिवाजी विद्यालयात त्या मुख्याध्यापिका होत्या. अनुताई वाघ यांच्या हस्ते त्यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे आणि आणखी विशेष म्हणजे महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या त्या भगिनी आहेत. एन.डींच्या फडकणाऱ्या झेंड्याच्या सरोजताई काठी आहेत.**

**रामशेठ ठाकूर** - मेहनतीनं 'शेठ' झाले. पण, शेठ हे विशेषण त्यांना लागण्यापूर्वी लहानपणीचा राम मला माहिती आहे. त्यांच्या लहानपणात त्यांनी जे कष्ट केले, ते ऐकताना मन अस्वस्थ होतं. कोणतीही शैक्षणिक पार्श्वभूमी नाही, आई-वडील फार शिकलेले नाहीत, खेडेगावातला जन्म, घरची परिस्थिती अगदी बेताची. हातावर पोट, या स्थितीत छोटा राम जिद्दीने शिकला आणि शिकत असताना त्यांचे आदर्श होते, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील. आई-वडिलांचे उत्तम संस्कार आणि सासरे जनार्दन भगत यांचा पाठिंबा यांच्यामुळे जीवनाच्या प्रत्येक वळणावर खाचखळगे आणि काटेकुटे असताना लहानग्या रामने आपला प्रवास सुरु ठेवला. 'देणे समाजाचे देतो आनंदाने' असं म्हणत प्रामाणिकपणा, सचोटी, कष्ट या जोरावर बघताबघता राजकीय नेते झाले आणि रामशेठही झाले. त्यांच्या दारी लक्ष्मी प्रसन्न झाली. या लक्ष्मीचा उपयोग समाजाच्या उत्कर्षासाठी

केला पाहिजे. शिवाय, जे उजव्या हाताने केले ते डाव्या हाताला कळू देता कामा नये. जे दिले त्याचा अहंकार नाही. 'देताना' ना धर्म पाहिला ना जात पाहिली. अत्यंत आनंदी मनाने आपली भरली ओंजळ रिती करताना लोकांच्या प्रेमातूनच रामचा 'रामशेठ' आणि रामशेठचा 'लोकनेता' होता होता ७० वर्षे कधी सरली, हे कळलेही नाही.

या सत्तरीच्या उंबरठ्यावर त्यांना लाख लाख शुभेच्छा आहेत. लहानपणी न्हावाशेवा खाडी गावातून चिखल तुडवीत गव्हाण गावातील शाळेत शिकायला जाणे. शाळेतून आल्यावर पडावावरील कामगारांचे जेवण बनविणे, त्याबद्दल मिळणारी एक रुपयाची मजुरी आईला देणे, आईची चूल पेटवायला लाकूड- फाटा आणायला जंगलात जाणे. पाण्याचे हांडे डोक्यावरुन वाहणे... आज बालमजुरांना बंदी आहे. पण, त्या काळात हे कष्ट केल्याशिवाय जेवण मिळत नाही, अशी परिस्थिती होती. या कष्टामध्येच काम करताकरता प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण त्यांनी पूर्ण केलं. पण, उच्च शिक्षणाचं काय? पैसे आहेत कुठे? पण शिकायचा हा ध्यास आणि त्यांचं भाग्य उजळलं. त्यांना एक गुरु भेटला. हा महान गुरु. त्यांनी मंत्र दिला, 'कमवा आणि शिका'. श्रम हीच पूजा झाली. विद्यार्थ्यांनी घाम गाळून फोडलेली खडी हे डॉलर झाले. शिक्षणाच्या आड पैशांचे नाणे आड येणार नाही, अशी शिकवणी देणारे कर्मवीर त्यांना भेटले. जीवनाला तेथून कलाटणी मिळाली. उत्तम शिक्षक आणि प्राचार्य भेटले. कर्मवीरांची भाषणे ऐकली, एन.डी. पाटील साहेबांची भाषणे ऐकली, बॅ. पी.जी. पाटलांची भाषणे ऐकली. या वैचारिक भाषणांतून मनाची मशागत झाली. त्यातूनच बी.ए झाले. डी.एड झाले, शिक्षकही झाले. व्यवसायात मन ओढले गेले होते. त्यातून उत्तम जम बसविला. जे मिळवले, ते समाजाकरिता परत गेले. त्याकरिता शैक्षणिक संकुलं बांधली, मंदिरे न बांधता विद्यामंदिरे बांधली आणि ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना उत्तम विद्या दिली. दिशा दिली. सर्व जाती-धर्मांच्या मुलांना पायावर उभे केले.

१९९८ ला खासदार झाले. त्यांच्याच एका मताने केंद्र सरकार पाडण्याचा पराक्रम त्यांनी केला. १९९९ ला पुन्हा खासदार झाले. पण त्यानंतर त्यांनी राजकारणात प्रत्यक्ष पद घ्यायचं नाही, असं ठरवलं आणि समाजकारणामध्ये त्यांनी आपलं काम सुरू केलं. पनवेल, खारघर, गव्हाण, इथे शैक्षणिक संकुले उभी केली. विद्यार्थ्यांना प्रवेश देताना डोनेशन नाही. शिक्षक, प्राध्यापकांना नोकरी देताना देणग्या नाहीत. एन.डी. पाटील यांच्यासारख्या नामवंत विचारवंताने रामशेठंना हेरलं आणि रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलमध्ये कित्येक वर्षे त्यांना काम करायची संधी मिळाली.

आज रामशेठ ही व्यक्ती राहिली नसून महासंस्था बनलेली आहे. जीवनात अनेकजण पैसे मिळवतात. पण, त्यात माणुसकीचे कोंदण सर्वात महत्वाचे असते. आपण सधन होताना सामान्य कार्यकर्त्यांनाही त्यांनी तेवढ्याच ताकदीने मदत केली, आधार दिला. मी जेव्हा 'सागर पाटील विद्यालयाला' रामशेठ यांच्याकडे मदत मागितली. तेव्हा त्यांनी भरभरुन दिलं. त्याचं कारण, एन.डी. आणि मी यांच्याशी त्यांचं नातं अत्यंत जिव्हाळ्याचं आहे. एन.डी. पाटील यांच्यावर त्यांचा जीव आहे. रयत शिक्षण संस्थेमधील मॅनेजिंग कौन्सिलच्या बैठकीत एन.डी. पाटील यांना एखादा प्रस्ताव मान्य झाला नाही, तर त्यांच्या स्वभावाप्रमाणे ते चिडतात. पण हा राग मुद्याचा असतो, व्यक्तीवर नसतो. अशावेळी एन.डी. पाटील यांची समजूत घालणे, हे काम कोण करू शकतं. ते फक्त रामशेठ करू शकतात. एन.डी. आणि रामशेठ यांच्यामधलं प्रेम, या प्रेमाला काय नाव द्यावं? एकापरिने गुरु-शिष्याचं प्रेम म्हणा किंवा माय, लेकरासारखं.

आज रामशेठ यशाच्या शिखरावर आहेत. या यशात रामशेठना आयुष्यभर साथ देणाऱ्या त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला यांचा खूप मोठा वाटा आहे. एक मैत्रीण, एक प्रेयसी, नंतरची पत्नी... **शकुंतला आज ऐश्वर्य भोगते आहे. पण, रामशेठच्या काबाडकष्टाच्या काळातही आपल्या पतीला तेवढीच साथ दिली होती. रामशेठचा गोतावळा मोठा. घरात पाहुण्यांचा राडा, पण सर्वांचे प्रेमाने करणे, जेवण खाण्यापासून नाश्त्यापासून त्यांना डबे बांधून देण्यापर्यंत अतिशय प्रेमाने शकुंतलाने सर्वांचे मनापासून केले. आणखी एक विशेष आहे. सर्वच घरांतील मंडळींना आपल्या पतीच्या दानशूरतेला पाठिंबा नसतो, पण रामशेठच्या औदार्याबद्दल शकुंतलाने कधीही तक्रार केलेली नाही.**

रामशेठचे दोन सुपुत्र प्रशांत आणि परेश या बहुगुणी रत्नांना उत्तम संस्कार देऊन शकुंतलाने घडवले. दोन्ही सुनांवर मुलींसारखे प्रेम केले आणि मुलगी नसल्याची उणीव भरून काढली. मातीचे नाते या कुटुंबाने कधीच तोडलेले नाही. रामशेठचे कुटुंब म्हणजे एक कल्पवृक्ष आहे. या सावलीत फार निरामय वाटते. ■

# वलयांकित नेतृत्व रामशेठ







**श्री. हर्षवर्धन पाटील**
माजी सहकार मंत्री

**मुंबई-पनवेल-पुणे** या पट्ट्यातील आणि रायगड जिल्ह्यातील वलयांकित नेतृत्व म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे पाहिले जाते. समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासासाठी रामशेठ सतत प्रयत्नशील असतात. त्यांनी त्यांच्या कर्तृत्वाने राजकारण, समाजकारण, शिक्षण, सहकार, सांस्कृतिक, कला, क्रीडा आणि धार्मिक, आध्यात्मिक अशा विविध क्षेत्रांत स्वतःची उंच प्रतिमा निर्माण केली.

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, माजी खासदार रामशेठजी राजकारणाबरोबरच दानशूर समाजकारणी म्हणूनही राज्यात त्यांची ओळख आहे. सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या तळागाळातील घटकांसाठी त्यांनी केलेल्या कामातूनच त्यांना जनतेनेच लोकनेता ही पदवी दिली. गरीब गरजूंना मदतीचा हात देऊन त्यांनी ही बांधिलकी आयुष्यभर जपली. गेले ४५ वर्षे रायगड जिल्ह्याच्या विकासासाठी आणि पनवेलच्या विकासाचे शिल्पकार म्हणून त्यांनी झोकून देऊन काम केलेले आहे. १९७४ मध्ये तीन वर्षे शिक्षकाची नोकरी केल्यावर उद्योग व्यवसायात ते उतरले आणि त्यात मोठे यश मिळवले. यश मिळाल्यावर ज्या समाजात आपण वावरतो, त्या समाजाचे आपण काही तरी देणे लागतो. त्यातूनच त्यांनी समाजसेवेचे व्रत कायमचे स्वीकारले आहे.

राजकारणात काम करीत असताना माझा त्यांच्याशी अनेकवेळा जवळून संबंध आला. कामाचा झपाटा, विकासाची दूरदृष्टी असलेले हे नेतृत्व रायगड जिल्ह्याच्या राजकारणात रामशेठ किंगमेकर आहेत. १९९८ मध्ये १२ व्या लोकसभेसाठी निवडणूक लढवून ते विजयी झाले आणि १९९९ साली पुन्हा ते विजयी झाले. मी त्यांचे वैशिष्ट्य असे मानतो की, अनेकवेळा मोठी पदं मिळत असताना ती पदे न स्वीकारता त्यांनी इतरांना संधी दिली.

पनवेल शहराचा कायापालट रामशेठ यांच्यामुळे झालेला आहे. मुंबई-पुणे यांना जोडणारे पनवेल आता मध्यवर्ती ठिकाण आहे. पनवेल महानगरपालिका होण्यापासून पनवेलच्या विकासात रामशेठ यांनी प्रभावीपणे काम केले. पूर असो किंवा कोरोना असो या संकट काळात त्यांनी लोकांना मदतीचा कायम हात दिला. शैक्षणिक संस्था उभ्या केल्या, त्यांचे सुपुत्र आमदार प्रशांत ठाकूर आता भाजपाचे आमदार असून दुसरे सुपुत्र परेश महानगरपालिकेत प्रभावी काम करत आहेत. रामशेठ यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने मी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा देतो. ■



## डॉ. अनिल पाटील म्हणतात...

# 'रयत' के पास रामशेठ है...

**आज आम्हास कोणी विचारले रयत शिक्षण संस्थेजवळ काय आहे? तर आम्ही अभिमानाने सांगतो, 'रयत' के पास रामशेठ है। उजव्या हाताने केलेले दान डाव्या हाताला समजू न देणाऱ्या दानशूर रामशेठ यांचा आज वाढदिवस!. ईश्वर त्यांना आरोग्यदायी जीवन देवो, हीच संस्थेकडून मन:पूर्वक शुभेच्छा!**

**स्वतःची शिक्षण संस्था** नावारुपास आणली असताना, ज्या शाळेत व संस्थेत आपण शिकलो त्याचे काहीतरी देणे लागतो. या कृतज्ञतेच्या विचारावर व कर्मवीर अण्णांच्या त्यागाच्या भावनेवर माजी खासदार रामशेठ ठाकूर रयत शिक्षण संस्थेला भरभरून मदत करत आहेत. आज आम्हास कोणी विचारले रयत शिक्षण संस्थेजवळ काय आहे? तर आम्ही अभिमानाने सांगतो 'रयत' के पास रामशेठ है। उजव्या हाताने केलेले दान डाव्या हाताला समजू न देणाऱ्या दानशूर रामशेठ यांचा आज वाढदिवस! ईश्वर त्यांना आरोग्यदायी जीवन देवो, हीच संस्थेकडून मनःपूर्वक शुभेच्छा!



डॉ. अनिल पाटील,
अध्यक्ष,रयत शिक्षण संस्था, सातारा

रामशेठ ठाकूर कोट्यवधी रुपयांचे दातृत्व करूनही हवेत नसणारा माणूस. एवढे मोठे दान करुन ज्यांचे पाय जमिनीवरुन कधीच सुटले नाहीत, त्यांनी कधीही मोठेपणा मिरवला नाही, उजव्या हाताने केलेले दान डाव्या हातालाही कळू दिले नाही, असा हा भला माणूस. या अजातशत्रू माणसाचे आणि रयत शिक्षण संस्थेचे वेगळे नाते आहे. १९६४ साली रामशेठ ठाकूर यांनी रयतच्या गव्हाण येथील हायस्कूलमध्ये शिक्षणास सुरुवात केली. 'कमवा आणी शिका' या योजनेत सातारा येथील शिवाजी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. शिवाजी कॉलेजशी त्यांचे नाते १९६८ ला जडले ते आजपर्यंत कायम आहे. त्यांच्या गव्हाण या जन्मगावातील शाळेशी नाते नसेल, तेवढे ते सातारच्या शिवाजी कॉलेजशी जोडले गेले. पदवीनंतर त्यांनी बी.एड. केले व शिक्षक झाले. त्यानंतर व्यवसायात ते अप्रतिम यश मिळवत गेले, तरीही त्यांचे रयतशी नाते कायम राहिले. रामशेठ ठाकूर यांचे कार्यक्षेत्र असणारा रायगड हा रयत शिक्षण संस्थेचा लहान विभाग होता. रयतमध्ये पूर्वी रायगडला अंदमान मानले जात होते. कोणाला शिक्षा द्यायची असेल, तर त्याची बदली रायगडला केली जात असे. आज उलट परिस्थिती आहे. प्रत्येक जण रायगडच्या बदलीसाठी मागे लागतो. त्याचं कारण एकच, रामशेठ. तेथे रामशेठची सुरक्षितता असते, पाठबळ असते. नवीन काहीतरी करण्याची संधी मिळते. रयतचे ॲटानॉम्स कॉलेज होण्याचा मान मिळवला तो वाशी येथील कॉलेजने, रामशेठ यांच्या प्रयत्नामुळेच. रयतच्या नावावर पेटंट मिळण्याची सुरुवात याच कॉलेजमधून सुरू झाली. जे निर्माण करायचे ते गुणवत्तादायक व दर्जेदारच. हा

रामशेठ यांचा आग्रह, त्यामुळेच रयतच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा गुणवत्तेत अग्रेसर आहेत. रयत शिक्षण संस्थेबरोबर त्यांची स्वतःची संस्थाही सुरू आहे. दोन्ही संस्थांच्या शैक्षणिक दर्जात त्यांनी अजिबात तडजोड केलेली नाही. म्हणूनच, दोन्ही संस्थांचे कॉलेज व इंग्रजी माध्यमाच्या शाळा लौकिकप्राप्त बनल्या आहेत. शिक्षणासाठी कर्मवीर अण्णांकडून समर्पण आणि त्याग हे गुण रामशेठनी घेतल्याचे अधोरेखित होत आहे. शिक्षणाच्या खासगीकरणामुळे या क्षेत्राचा व्यवसाय बनला आहे, यात बदलत्या काळानुसार बदल करुन जो गुणवत्ता टिकवेल तोच टिकेल. बदलासाठी भांडवलाची आवश्कता असते, नाहीतर शिक्षण संस्था मागे पडणारच! रयत शिक्षण संस्थेचे जाळे प्रामुख्याने ग्रामीण व दुर्गम भागात विस्तारले आहे. त्यामुळे या संस्थेत एखादा साधा बदल करायचे म्हटले तरी कोट्यवधी रुपयांची गरज लागते. शिक्षण संस्थेत मुलांना शिक्षणासाठी संगणक घ्यायचे हा विषय आला, त्यावेळी निधी कसा उभा करायचा यावर चर्चा सुरू होती. या प्रोजेक्टला १ कोटी रुपये लागणार होते. संस्थेची आर्थिक स्थिती एवढा मोठा निधी उपलब्ध करण्यासारखी नव्हती. १ मे च्या कार्यक्रमावेळी हा विषय अजेंड्यावर होता. बैठकीत आदरणीय शरद पवार साहेबांनी रामशेठ ठाकूर यांच्याकडे पाहून रामशेठ काय? असे विचारले, यावर रामशेठनी एक कोटी रुपये देण्याचे जाहीर केले. मोखाडा या आदिवासी भागातील कॉलेजचा नॅंकचा प्रस्ताव प्रलंबित होता, तिथे तीन कोटी रुपये लागणार होते. पवार साहेबांनी, पवार चॅरिटेबल ट्रस्टकडून एक कोटी रुपये देतो सांगितले व रामशेठ यांच्याकडे पाहिले, रामशेठनी लगेच एक कोटी रुपये देऊ केले.

सातारा येथील शिवाजी कॉलेजची इमारत बांधण्याचे ठरले, तेव्हा रामशेठनी एक कोटी रुपये देतो, असे सांगितले. फक्त सांगितले नाही तर, स्वतःच्या देखरेखीखाली तेवढे बांधकाम पूर्ण करून घेतले व आणखी एखादा मजला वाढवण्याचे सुचवले. त्यावेळी आम्ही पैशांची अडचण असल्याचे सांगितले. त्यांनी आणखी एक कोटी देतो, असे सांगितले व दिले. त्यामुळे बांधकाम सुरू राहिले. पुन्हा एका महिन्यानंतर बांधकामाची पाहणी करण्यासाठी ते आले, अरे व्वा छान झालंय बांधकाम, अशी टिप्पणी केली. आता सगळेच बांधकाम पूर्ण करतो, असे सांगून शिवाजी कॉलेजसाठी त्यांनी चार कोटी रुपये खर्च केले. आज शिवाजी कॉलेजची सुंदर वास्तू उभी आहे, ती रामशेठ यांच्यामुळेच! संस्थेनेही त्याला रामशेठ भवन असे नाव दिलंय. जिथं मी शिकलोय, ते कॉलेज देशातलं सर्वोत्कृष्ट कॉलेज व्हावं, ही रामशेठ यांची भावना निश्चितपणाने संस्थाही सार्थ करून दाखवेल. सहज बोलता-बोलता चणेफुटाणे वाटल्यासारखे ते निधी देतात. केवढं मोठं दातृत्व त्यांच्याकडे आहे. संस्थेसाठी वाहून घेणारा रामशेठ ठाकूर सरळ आणि साधा माणूस आहे. कर्मवीर अण्णांच्या पश्चात संस्थेसाठी पूर्णपणे वाहून घेणारे हाताच्या बोटांवर मोजण्याएवढेच लोक आहेत, त्यात रामशेठ यांचं नाव अग्रणी आहे. मोठमोठे उद्योजक आपल्या कंपन्यांचा सीएसआर फंड आपल्याला हवा तसा वापरण्यासाठी फाउंडेशनची स्थापना करतात. मात्र, रामशेठ एकमेव अशी व्यक्ती आहे, ज्यांनी संस्थेला सीएसआर फंड दिला. मात्र, खर्ची टाकण्याचे सर्वाधिकार संस्थेसच दिले. केवढे मोठे दातृत्व, रामशेठ यांच्या या दातृत्वास सलाम.

संस्थेविषयी तळमळ कशी असते, याचा एक किस्सा... वाशी हायस्कूल हे शासनाकडून मिळालेले. त्यावेळी सीआरझेडचा नियम नव्हता. तो नंतर आला. नियमाच्या अधिन राहून काही रक्कम शासनाकडे भरायची होती. ती भरायची राहून गेली होती. काही कोटीत ती रक्कम असल्यामुळे संस्थेस भरणं शक्य नव्हतं. रक्कम भरली नसती तर लिलावाची नामुष्की होती. कोणत्याही परिस्थितीत या प्रकरणास स्टे मिळवणं गरजेचं होतं आणि हे काम फक्त मुख्यमंत्रीच करू शकत होते. मुख्यमंत्र्यांच्या भेटीपासून ते स्टे मिळेपर्यंत रामशेठ अस्वस्थ होते. मुख्यमंत्र्यांची वेळ व भेटीसाठीचे सर्व सोपस्कार रामशेठनी पार पाडले. रामशेठ असल्यामुळे मुख्यमंत्र्यांनीही जागेवर स्टे देऊन टाकला. त्याक्षणी रामशेठ यांच्या चेहऱ्यावरील भाव, संस्थेविषयीची आस्था अधोरेखित करून गेले. यावरुन एकच सांगावेसे वाटते, संस्थेची अडचण ही आपली स्वतःचीच अडचण असे समजून रामशेठ संस्थेसोबत उभे राहतात.

त्यांनी निर्माण केलेली संस्थाही नावारूपास आणली आहे. तेथील शिक्षण दर्जेदार असल्यामुळे प्रवेशासाठी प्रतीक्षा करावी लागते. नावलौकिकप्राप्त स्वतःची शिक्षण संस्था असताना, केवळ आपण शिक्षण घेतलेली संस्था व ग्रामीण भागात जाळे असल्यामुळे महाराष्ट्राच्या तळागाळात दर्जेदार उच्च शिक्षण पोहोचावे, ज्यांची विकत शिक्षण घेण्याची ऐपत नाही, अशी गरीब मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत, हीच भावना रामशेठ यांची स्पष्ट होते. अशा दानशूर माणसाला उत्तम आयुरारोग्य लाभो, संस्थेची शंभरी साजरी केली तशी त्यांचीही शंभरी साजरी करण्याचे भाग्य संस्थेस मिळो हि सदभावना. ■

# रामशेठ, अभिनंदन...



## श्री. सुशीलकुमार शिंदे

माजी केंद्रीय गृहमंत्री


**प्रिय रामशेठ....**

तुमचा ७० वा वाढदिवस २ जून रोजी आहे. तुमच्या या वाढदिवसाच्या शुभदिनी माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा...

गेली ५० वर्ष आपण रायगड जिल्ह्यात सातत्याने सामाजिक कामात स्वतःला झोकून दिले आहे. गरिबीचा सामना करुन आपण उच्चविद्याविभूषित झालात. शिक्षकाचा पवित्र व्यवसाय स्वीकारलात, तेव्हापासूनच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळालं पाहिजे ही आपली मानसिकता तयार झाली. त्याचवेळी आपल्यातला उद्योजकही आपणास खुणावित होता. आपल्यातला यशस्वी शिक्षक, यशस्वी उद्योजक, यशस्वी शिक्षणतज्ञ, रयत शिक्षणसंस्थेच्या संस्काराने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण संस्था उभारणारा शिक्षणशास्त्री. त्याचवेळी शेतकऱ्यांसाठी लढणारा खंबीर नेता अशी आपली विविध रुपे मी फार जवळून पाहिलेली आहेत. त्यामुळे आपण कोणत्या राजकीय पक्षात आहात यापेक्षासुध्दा सामान्य माणसांशी आपले असलेले इमान त्याच भूमिकेवर आपण ठाम राहिलात. याचे मला विशेष अप्रूप आहे.

आपले दोन्ही सुपुत्र-श्री. प्रशांत आणि श्री. परेश यांनी आपला सामाजिक आणि राजकीय सेवेचा वसा पुढे चालू ठेवलेला आहे. रयत शिक्षण संस्थेच्या भाऊराव पाटील यांच्यावर असलेली श्रध्दा आणि त्याला कृतीची जोड यामुळे आपली सामाजिक आणि शैक्षणिक जाणीव नेहमीच सकारात्मक राहिलेली आहे.

आणखी एका गोष्टीचा उल्लेख करतो. १९९८ साली केंद्रामधील वाजपेयी यांचे सरकार रामशेठ यांच्या एका मताने वाचू शकत होते. अनेक प्रलोभने नाकारुन रामशेठ यांनी प्रलोभने ठोकरली पण वाजपेयींविषयी नितांत आदराची भावना कायमची जपली. त्यामुळेच राजकारणात रामशेठ कोणासोबत आहेत त्यापेक्षा त्यांची मानसिकता सर्वांबद्दल आत्मियता राखणारी आहे, त्यामुळे राजकारणातला मतभेद रामशेठ यांच्या मैत्रीच्याआड कधीच येत नाही. आपल्या ७०व्या वाढदिवशी मी मनःपूर्वक शुभेच्छा देतो आणि ईश्वर आपणास उदंड आयुष्य देवो, अशी प्रार्थना करतो. आपले अभिनंदन करतो. ■



# जिथे रामशेठ तिथे विजय....



## श्री. गणेश नाईक, आमदार

**श्री रामशेठ ठाकूर** बघता बघता ७० वर्षांचे झाले, हे मानायला मनाची तयारी नाही. सार्वजनिक जीवनात वावरताना त्यांचा उत्साह ४० वर्षांचाच आहे. याच उत्साहात ते आजही वावरतात, याचे मनस्वी आश्चर्य वाटते. याचे मुख्य कारण, सामाजिक जीवनातील त्यांची बांधिलकी हा सगळ्यात महत्वाचा पैलू आहे. शिवाय, सार्वजनिक जीवनात, राजकारणात वावरताना जात आणि धर्मांच्या सगळ्या भिंती ओलांडून हा नेता.... कशांमुळे शिल्लकच उरतो आहे, हे त्यांचे खरे वैशिष्ट्य आहे. रामशेठ यांना राजकारणात अनेक वर्ष पाहतो आहे. मी ही राजकारणात आहे. पण रामशेठ पदासाठी राजकारणात नाहीत. लोकसभा निवडणुकीत तिसऱ्यांदा हॅट्ट्रिक करण्याची सहज संधी असताना त्यांनी लोकसभा तिकीट मागितले नाही, लोकसभा लढवली नाही, विधानसभा तिकीट मागितले नाही. त्यांच्या शब्दावर ते ठाम राहिले. नाहीतर राजकारणात आम्ही असे पाहतो की, अनेकजण 'नको-नको' म्हणत कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर उभे राहतो असे सांगतात. रामशेठ शब्दावर ठाम राहतात हे त्यांचे वेगळेपण आहे. राजकारणात राहावयाचे पण राजकारण अंगाला चिकटून घ्यावयाचे नाही. हे त्यांना अगदी सहज जमलेले आहे. मला या नेत्याचे मनस्वी कौतुक आणि आश्चर्य याकरिता वाटते की, बॅ.अंतुले यांच्यासारखा नेता, दि.बा.पाटील यांच्यासारखा नेता यांना लोकसभा निवडणुकीत पराभूत केल्यावर रामशेठ हुरळून जात नाहीत. स्वतःला जायंट किलर म्हणत नाहीत. पण दोन्ही पराभूत उमेदवारांबद्दलचा आत्यंतिक आदर ते मनात जपतात आणि त्यांच्या वागण्यात त्या आदराचा नेहमी प्रत्यय येतो. यासाठी मनाचा फार मोठेपणा लागतो.

रामशेठ यांच आणखी एक नेतृत्व विशेष गुण एक मानला पाहिजे, ते शेतकरी कामगार पक्षात असताना शेकापक्ष रायगड लोकसभा निवडणूक दोनदा जिंकला. रामशेठ काँग्रेसमध्ये आल्यावर ५० वर्षे पनवेलमध्ये पराभूत न झालेला शेतकरी कामगार पक्ष पराभूत होऊन रामशेठ यांचे सुपुत्र प्रशांत ठाकूर विजयी झाले. जी जागा काँग्रेसला ५० वर्षे मिळाली नव्हती, ती रामशेठनी जिंकून दाखवली. २०१४च्या विधानसभा निवडणुकीच्यावेळी रामशेठ भाजपामध्ये आले आणि पनवेलची जागा रामशेठनी भाजपाकरिता जिंकून दिली. राजकीय अभ्यासकांनी याचे विश्लेषण करणे गरजेचे आहे. रामशेठ हे विजय मिळवून देणारे नेतृत्व आहे. या विजयात उन्माद दिसत नाही, प्रामाणिक बांधिलकी दिसते. रामशेठ ७० वर्षांचे कधी झाले तसेच त्यांच्या विजयाचेही सूत्र समजणे अवघड आहे. त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी एवढीच शुभेच्छा व्यक्त करतो की, त्यांचा १०० वा वाढदिवस आम्हाला साजरा करता यावा.

# रामशेठ : मला आवडणारा नेता



## श्री. नारायण राणे

### माजी मुख्यमंत्री / खासदार राज्यसभा

'**रामशेठ ठाकूर** हे मला आवडणारे नेते आहेत....' श्री.नारायण राणे यांनी मुलाखतीची सुरुवात याच वाक्याने केली. अगदी सहज बोलताना ते म्हणाले 'मनापासून सांगतो, हा माणूस मला खूप आवडतो.. माणूस म्हणून तो खूपच मोठा आहे. वागण्यात अत्यंत नम्र आहे, सरळसाधा आहे. पोशाखाने, वागण्याने, पण तत्वाला ठाम आहे...'

आणि मग राणेसाहेबांनी रामशेठ उलगडून दाखवले...'रामशेठ दोनवेळा खासदार होते, आताही ते राजकारणात आहेत, समाजकारणात आहेत. १४ शिक्षणसंस्था चालवत आहेत. सर्व जातीधर्माच्या मुलांना उत्तम शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी एवढे शिक्षण प्रकल्प उभे केले, हे सर्व मान्य. त्यात त्यांचे मोठेपण आहेच, पण मला रामशेठ सर्वात जास्त भावतात याचे कारण मराठी उद्योजक यशस्वी होत नाही हा समज रामशेठ यांनी आपल्या चिकाटीने, प्रामाणिक प्रयत्नाने खोटा ठरवलेला आहे. एक अत्यंत यशस्वी मराठी उद्योजक म्हणून मला रामशेठ फार फार आवडतात. उद्योगात यशस्वी होणं सोपं नाही. त्यामुळे मला त्यांचा अभिमानही वाटतो आणि त्यांचं कौतुकही वाटतं. एवढ्या शिक्षण संस्था, राजकारण, समाजकारण, सर्व सांभाळून उद्योजक म्हणून यशस्वी होणं ही सोपी गोष्ट नाही.'

नारायण राणे सांगू लागले.. '२०-२५ वर्षे झाली असतील माझी आणि त्यांची पहिली भेट एन्रॉन विद्युत प्रकल्प सुरु झाला त्यावेळी झाली होती ते उद्योजक म्हणूनच माझ्याकडे आले होते. पुढे आम्ही एकाच पक्षात राजकारणात आलो आणि आजही आम्ही एकत्र काम करत आहोत. मला हा माणूस जिद्दीचा वाटतो. उद्योगात यशस्वी होताना या नेत्याने सिडकोच्या जमिनींना वाजवी भाव मिळावा म्हणून शेतकऱ्यांसाठी जो लढा त्यात- दि.बा.पाटील हेही होते, हा मोठा लढा होता. जे.एन.पी.टी.चा लढाही खूप मोठा होता. शेतकऱ्यांसाठी या भागात लढताना आजच्या रायगडच्या विकासातही रामशेठचा वाटा फार मोठा आहे. त्यांच्या नावात राम आहे आणि त्याच्यापुढे शेठ आहे. पण ही दोन्ही नावे एकत्र जोडल्यावर जो रामशेठ तयार झाला, तो लोकांना आवडणारा आहे. शेठ म्हटल्यावर जी वाईट प्रतिमा निर्माण होते, ती रामशेठ यांनी खोडून काढलेली आहे.

७० व्या वाढदिवशी मी त्यांना मनापासून शुभेच्छा देतो आणि त्यांचे अभिनंदन करतो, त्यांचा मुलगा प्रशांत हाही प्रभावीपणे काम करतो आहे, याचा आनंद आहे.

# रामशेठ म्हणजे परिस



श्री. महेंद्र घरत, कामगार नेते

लोखंडाला परिसाचा स्पर्श झाल्यावर त्याचे सोने होते असे म्हणतात. परिस कोणी पाहिला नाही, परंतु रामशेठ ठाकूर यांच्या रूपाने मी परिस पाहिला. त्यांचा परिसस्पर्श मला झाला, म्हणूनच माझ्या आयुष्याचे सोने झाले असे मला वाटते. माझे गाव शेलघर आणि याच शेलघरचे स्व. जनार्दन आत्माराम भगत साहेब यांचे जावई रामशेठ ठाकूर साहेब. आम्ही लहान असताना जनार्दन भगत साहेब हे त्या वेळी पंचक्रोशीत प्रसिद्ध नेते होते. पंचायत समिती सभापती ही भगत साहेबांची ओळख सर्वसामान्यांच्या हृदयात त्या वेळी कायम कोरली गेली. त्यांच्या राजकीय वलयापोटी शेलघरमध्ये पुढाऱ्यांची त्या वेळी ऊठबस असायची. मी भगत साहेबांच्या घराच्या ओटीवर लहानाचा मोठा झालो. त्यामुळे कळत-नकळत काही संस्कार भगत साहेबांचे माझ्याही अंगात भिनले. त्यावेळी भगत साहेब यांच्या दिवाणखान्यात मध्यभागी एक तसबीर लावलेली होती. हातामध्ये कागदाची गुंडाळी आणि वेगळ्या प्रकारच्या पेहरावाची. त्या फोटोवर बोट दाखवून आम्हाला यांच्याकडून काहीतरी शिका, अभ्यास करा आणि हुशार व्हा, असा सल्ला भगत साहेब देत. तो फोटो होता अर्थातच रामशेठ ठाकूर यांचा, पदवीदान समारंभातला. हे आजही लख्ख आठवते ते रामशेठ ठाकूर साहेबांच्या सत्तराव्या वाढदिवसानिमित्त थोडे लिहिताना, आठवणींना उजाळा देताना... असे रामशेठ ठाकूर साहेब त्यावेळी आमचे आदर्श म्हणून जनार्दन भगत साहेबांनी आमच्यापुढे ठेवलेले. रामशेठ ठाकूर साहेबांची आजपर्यंतची वाटचाल पाहता भगत साहेबांचे ते शब्द तंतोतंत खरे ठरलेत, असे मला वाटते.

शिक्षकी पेशा असल्याने १९७४-७५च्या दरम्यान रामशेठ ठाकूर-शकुंतलाताई नवी मुंबईतील वाशी येथे राहायला गेले. त्यावेळी प्रशांत आणि परेश हे लहान होते. मी भगत साहेबांचा मुलगा संजय याच्यासोबत त्या वेळी रामशेठ ठाकूर यांच्या घरी वाशीला जायचो. त्या वेळी रामशेठ ठाकूर आम्हा सर्वांना घेऊन चित्रपट पाहायला नेत असत. ती दंगामस्ती, ते दिवस आठवताना आजही अत्यानंद होतो.

कालांतराने न्हावा येथे ओएनजीसी, माझगाव डॉकसारखे प्रकल्प आले. साहजिकच या प्रकल्पांना मूलभूत सुविधा पुरविताना काही कामे होत होती. काळाची पावले ओळखून रामशेठ ठाकूर साहेबांनी त्या वेळी व्यवसायात उडी घेतली. तीच उडी आज आघाडीचा उद्योजक होण्यापर्यंत कायम आहे, ही निश्चितच माझ्या दृष्टीने आनंदाची गोष्ट आहे. राज्यातील आघाडीचे उद्योजक म्हणून ते नावारूपाला आले आहेत. त्यांच्या व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या हजारो कुटुंबांचा ते पोशिंदा आहेत. (पान ३०)

# रामशेठ ठाकूर एक भला माणूस!

श्री. आर. सी. घरत

अध्यक्ष, पनवेल जिल्हा काँग्रेस कमिटी



**गेल्या अनेक** वर्षांपासून मी माजी खासदार रामशेठ ठाकूर यांना ओळखतो. ते गरिबीतून वर आलेले असल्याने त्यांना सर्वसामान्यांप्रति तळमळ, कणव दिसून येते. याच भावनेतून गोरगरीब, गरजूंना शक्य होईल तेवढी मदत ते करीत असतात. रामशेठ ठाकूर यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोठे कार्य केले आहे. रयत शिक्षण संस्थेतून 'कमवा व शिका' या कर्मवीर अण्णांच्या शिकवणुकीतून त्यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण घेतले आणि पुढे शिक्षणाची गंगा पनवेलसह रायगड जिल्ह्यात पोहोचविण्याचे व्रत अंगीकारले. त्यांनी स्वतःच्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेबरोबरच मातृसंस्था असलेल्या 'रयत'लाही वेळोवेळी पाठबळ दिले.रामशेठ ठाकूर ज्या परिस्थितीतून वर आले त्याची जाण ठेवून समाजाचे ऋण फेडण्यात त्यांच्याकडून कधी खंड पडला नाही. पुढे ते राजकारणात आले आणि त्यांनी वेगळी अशी शैली निर्माण केली. त्यांच्या यशाचा आलेख सतत चढता राहिला आहे. एक माणूस म्हणून ते चांगले आहेत. त्यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा! काही व्यक्ती चालत्या-बोलत्या संस्था असतात. त्यांच्या व्यक्तिमत्वाला अनेक पैलू असतात. रामशेठ एक यशस्वी उद्योजक आहेत. तसेच मुरब्बी राजकारणी आहे आणि समाजकारणीसुध्दा आहेत. सांस्कृतिक क्षेत्र, क्रीडाक्षेत्र यातही त्यांचे व्यक्तिमत्व प्रभावी आहे. त्यांच्या वाढदिवशी माझ्या शुभेच्छा! ■

# रामशेठ म्हणजे परिस

(पान २८ वरुन)

एवढी कुटुंबे चालवणे हीच रामशेठ ठाकूर यांची खरी कमाई, असे मला वाटते.स्वर्गीय जनार्दन भगत साहेब यांचे १९८८ मध्ये निधन झाले. त्यामुळे गव्हाण पंचक्रोशीत एक राजकीय पोकळी निर्माण झाली. ती भरून काढण्याचे काम रामशेठ ठाकूर साहेबांनी केले. त्यांनी व्यवसायात जम बसवून सामाजिक कामाला प्राधान्य दिले. रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय गव्हाण-कोपरचे ते चेअरमन झाले. तेव्हा ते राजकारणात सक्रिय नव्हते. तेव्हा मी माझगाव डॉकमध्ये बी.कॉम. होऊन नोकरी करीत होतो. तेथे युनियनच्या माध्यमातून नेतृत्वाची संधी मला रामशेठ ठाकूर यांनी दिली. त्यांच्या हाताखाली मला ज्युनिअर कॉलेजच्या (स्व. ज. आ. भगत कनिष्ठ महाविद्यालय) उभारणीत काम करता आले. मोरू नारायण म्हात्रे इंग्रजी माध्यमाची शाळा, सीकेटी महाविद्यालय असा शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याचा प्रवास त्यांच्यासोबत करता आला. रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारणीत मला खारीचा वाटा उचलता आला, हे मी माझे भाग्य समजतो. शांतादेवी मंदिर- गव्हाण, साईबाबा मंदिर- शेलघर, हनुमान मंदिर- कोपर या मंदिरांची उभारणी लोकवर्गणी आणि ठाकूर साहेबांची देणगी यातून झाली. पुढे लोकाभिमुख सामाजिक कामांवर रामशेठ ठाकूर यांनी भर दिला. देणगी, मदत करताना त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. त्यामुळे त्यांची प्रतिमा सामाजिक कार्यकर्ता अशी झाली, ती आजपर्यंत त्यांनी कायम टिकवून ठेवली आहे. दरम्यान, रायगड जिल्हा परिषदेची निवडणूक जाहीर झाली. त्यावेळी गव्हाण विभागातून जिल्हा परिषदेची उमेदवारी मला जाहीर करून त्यांनी सुखद धक्का दिला. मी एक नोकरी करणारा तरुण. त्या वेळी खिशात फार पैसे नसायचेच, परंतु रामशेठ ठाकूर यांनी मला गव्हाण विभागातून भरघोस मतांनी निवडून आणून दिले. त्यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी मोलाची साथ दिली. साहजिकच माझ्यासारख्या नवतरुणाला जिल्ह्याचा नेता त्यांनी बनविले. त्यानंतर इंटकचा रायगड जिल्हाध्यक्ष, बंदरातील युनियन काढण्यास प्रवृत्त करून आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यपातळीवर कामगार क्षेत्रात काम करण्यासाठी त्यांनी मला संधी दिली. माझ्या आयुष्याला त्यामुळे कलाटणी मिळाली आणि मी हा हा म्हणता आंतरराष्ट्रीय कामगार नेताही झालो. त्यामुळे माझ्या वाटचालीत रामशेठ ठाकूर हे दीपस्तंभासारखेच आहेत.

■

# उत्कृष्ट दिवाळी अंकाला ५० हजार बक्षीस....



दिवाळी अंक पारितोषिक विजेते... आणि दिग्गज... अरुणशेठ भगत, वाय.टी.देशमुख, अत्तदार प्रशांत ठाकूर, रामशेठ ठाकूर, कवी प्रविण दवणे, ठाण्याचे दिनकर गांगल, नरेंद्र वाबळे, देवदास मटाले, दीपक म्हात्रे आदी...



श्री. गिरीश गांधी

विदर्भाचे सांस्कृतिक नेतृत्व

**श्री. गिरीश गांधी हे विदर्भाचे सांस्कृतिक वैभव आहेत. महाराष्ट्रात हा एकमेव सांस्कृतिक नेता आहे की, ३६५ दिवसांत नागपूर-विदर्भात यांचे ३०० दिवस कार्यक्रम चालू असतात.**

**रामशेठ** यांचा आणि माझा फारसा परिचय नव्हता. त्यांनी आयोजित केलेल्या दिवाळी अंक स्पर्धांच्या बक्षीस समारंभ कार्यक्रमाला मी एकदा प्रमुख पाहुणा होतो. आमच्या विदर्भात अशा स्वरुपाचा कार्यक्रम होत नाही. मी बघत राहिलो. 'दिवाळी अंकां'च्या स्पर्धा आणि त्या स्पर्धेतील उत्कृष्ट अंकांना पहिलं बक्षीस ५० हजार रुपये, दुसरं बक्षीस ३० हजार आणि तिसरं बक्षीस १५ हजार, उत्तेजनार्थ ५ हजार... असा कार्यक्रम महाराष्ट्रात कुठे होत असेल असे वाटत नाही. राजकारणी, समाजकारणी लोक खूप आहेत, दानशूरही खूप आहेत. पण दिवाळी अंकांच्या स्पर्धा आणि त्या स्पर्धेत एवढी बक्षीसं. रामशेठ ठाकूर यांच्या कर्तृत्वामध्ये मी या एकाच विषयानं एवढा प्रभावित झालो की, या व्यक्तिमत्वामुळे मी थक्क होऊन गेलो आहे. ■

# सिडको लढ्यातील आम्ही सहकारी...



## श्री. जे.एम.म्हात्रे

माजी नगराध्यक्ष, पनवेल

**श्री. रामशेठ ठाकूर** आणि मी लहानपणापासून एकत्र वावरलो. अनेक वर्षापासून विविध क्षेत्रात काम करत राहीलो. मग ते राजकीय क्षेत्र असो, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्र असो. स्थानिक लोकांच्या न्याय हक्कासाठी आम्ही एकत्रितपणे लढलोसुध्दा. आजही चांगल्या कार्यात आणि समाज हिताच्या विरोधातील चुकीच्या गोष्टींच्या विरोधात पक्षीय भेद बाजूला ठेवून आम्ही एकत्रच असतो.

सर्वप्रथम स्व. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना करण्यासाठी आम्ही एकत्रितपणे काम केले. कोपर या गावी संस्थेची पहिली शाळा माझ्या स्वतःच्या घरात सुरु झाली. पुढे उलवे रोड नोड प्लॉट नं १ येथे माझे वडील मोरु नारायण म्हात्रे यांच्या नावाने ही शाळा उभारण्यात आली. या संस्थेच्या यशात रामशेठ ठाकूर यांचा सिंहाचा वाटा आहे. या संस्थेमध्ये मीही पदाधिकारी होतो. गरीब विद्यार्थ्यांना या संस्थेच्या विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये उत्तम शिक्षण मिळत आहे.

मी आणि रामशेठ या अनेक सामाजिक राजकीय आंदोलनात एकत्रपणे लढाई केलेली आहे. प्रकल्पग्रस्तांचे नेते मा. दि.बा.पाटील, दत्तूशेठ पाटील, जनार्दन भगत, वाजेकर शेठ, हसूराम शेठ, जोमा ठाकूर, विवेक पाटील, श्रावणशेठ, विश्वनाथशेठ, त्रिंबकशेठ, काळू खारपाटील, नारायणशेठ, सावळारामशेठ, एस. के. ठाकूर, नारायणशेठ घरत, रघुनाथशेठ घरत यांच्यासह स्थानिक भूमीपुत्रांसाठी केलेल्या लढ्यात रामशेठ आणि मी हिरिरीने भाग घेतलेला आहे. १९८१ ते १९८४ या तीन वर्षात सिडको विरोधातील लढ्यातही आम्ही आघाडीवर होतो.

सध्या रामशेठ ठाकूर आणि मी वेगवेगळ्या राजकीय पक्षांमध्ये काम करतो आहोत, ते त्यांच्या पक्षाचे काम करतात मी माझ्या पक्षाचे काम करतो. पण राजकीय मतभेद वगळता. आमच्या कौंटुबिक नात्यामध्ये कधीही कटुता येत नाही. शिवाय आम्ही दोघेही एकाच उद्योग व्यवसायात असताना आमच्यामध्ये कधीही टोकाचे वाद झालेले नाहीत, याचा मला आनंद आहे. २ जूनला त्यांचा ७० वा वाढदिवस आहे. त्या वाढदिवसानिमित्त त्यांना माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा! ■



# जो समोर येईल त्याचे दु:ख समजून घेणारे रामशेठ







**श्री. उल्हास पवार,** माजी आमदार


**जात-पात न** मानणाऱ्या महाराष्ट्रातील थोड्या राजकीय नेत्यांमध्ये मी रामशेठ ठाकूर यांचा उल्लेख करीन. रामशेठ यांच्याकडे येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची जात त्यांनी कधी विचारली नाही. त्यांच्याकडे काम घेऊन आलेल्या व्यक्तीने जात-धर्मांचा उल्लेख कधी केलेला नाही. कामासाठी आलेल्या व्यक्तीचा पक्ष रामशेठ यांनी कधी विचारला नाही. जो समोर येईल त्याचं दु:ख समजावून घेणे आणि त्याला मदत करणे असा खऱ्या अर्थाने सर्वधर्मसमभाव जपणारा.

समाजकारण, राजकारण अनेकजण करतात. पण रामशेठ यांनी या दोन्ही आघाड्यांवर काम करताना, कला, संस्कृती, क्रीडा आणि शिक्षण या चारही आघाड्यांवर चौफेर काम करुन दाखवलेलं आहे. त्यांनी उभ्या केलेल्या सर्व शिक्षण संस्था नामवंत ठरलेल्या आहेत. त्यांची सी.के.टी महाविद्यालयीन संस्था मी अतिशय जवळून पाहिलेली आहे. आधुनिक जगाची गरज लक्षात घेऊन ते महाविद्यालय मुंबई विद्यापीठातले सर्वोत्तम महाविद्यालय ठरेल. इतक्या अद्ययावत पध्दतीने त्यांनी उभे केले आहे. पनवेलसारख्या एका आडवळणाच्या गावात रामशेठ यांनी उभे केलेलं कॉलेज एकदा बघा. मुंबई विद्यापीठानं या कॉलेजला सर्वोत्तम विद्यापीठाचा किताब दिला आहे.

समाजकारण आणि राजकारण करताना रामशेठ भारतीय खेळांना विसरलेले नाहीत. क्रिकेटवर आज कोट्यवधी रुपये खर्च होतात आणि देशी खेळांकडे दुर्लक्ष होते. मला रामशेठ अधिक भावले त्यांनी राजकारणाएवढंच खेळांना महत्व दिले, देशी खेळाला महत्व दिलं. दरवर्षी त्यांनी कबड्डी सामन्यांचे आयोजन केले. याखेरीज सांस्कृतिक कलावंतांना रामशेठ ठाकूर यांनी मल्हार महोत्सवाचे व्यासपीठ उभं करुन दिलं आहे. त्यांनी आयोजित केलेल्या भजन स्पर्धेला मी उपस्थित होतो. कुस्ती स्पर्धा इथे आयोजित करतात. आणि दिवाळी अंकांच्या स्पर्धाही ही इथे होतात. हे व्यक्तिमत्व असे चौफेर आहे. ७० वर्षांचे झाले तरी रामशेठ यांचा उत्साह दांडगा आहे. शिवाय दातृत्वाचा एक अत्यंत दुर्मिळ असा गुणविशेष त्यांच्याकडे आहे. ते सांगतात की, देणाऱ्याला आपण मनापासून द्यावे, त्यामुळे रामशेठ यांचे निर्मळ मन त्यांच्या साध्या-साध्या वागण्यातून सतत जाणवत असते. महाराष्ट्रातला हा चौफेर असलेला हा नेता आहे. ■




खासदार रामशेठ ठाकूर यांच्या ४७ व्या वाढदिवसानिमित्त त्यावेळचे राष्ट्रपती के .आर .नारायणन आणि पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी अशा शुभेच्छा दिल्या होत्या .





नवीन पिढीला रामशेठ ठाकूर यांचा संदेश आहे... 'ज्या जागेवर आहात तिथे आपलं काम प्रामाणिकपणे करत राहा. एक ना एक दिवस यश मिळाल्याशिवाय राहणार नाही. 'थांबला तो संपला....' हा यशस्वी जीवनाचा मंत्र आहे.

सांगताहेत
रामशेठ ठाकूर...

# 'थांबला तो संपला....'

**'रामशेठ, तुमच्या वाढदिवसानिमित्ताने तुम्ही ७० वर्षांच्या आयुष्यात मोकळेपणाने बोलावं अशी या मुलाखतीमागची कल्पना आहे. तुमच्या आयुष्याचा जीवनपट तुम्हीच उलगडून दाखवावा.'**

**लोकनेते रामशेठ ठाकूर** यांनी ७० वर्षे पूर्ण केली. मागे वळून पाहताना त्यांना आयुष्यात ६५ वर्षे कष्ट केल्याची आठवण कायम आहे पण आयुष्यात यशस्वी झाल्याचा मनस्वी आनंद आहे. यशाने ते हुरळून गेले नाहीत. एवढेच नव्हे तर दोन लोकसभा निवडणुका जिंकल्यावर आणि या दोन निवडणुकांत दिग्गज नेते बॅ.ए.आर.अंतुले आणि शेतकऱ्यांचे नेते दि.बा.पाटील यांना पराभूत केल्यावरही रामशेठ सांगतात.... मी विजयी झालो तरी हे दोन्ही नेते मला कायमचे आदरणीय आहेत. तेव्हाही आणि आजही...



■ आणि ७० व्या वाढदिवसानिमित्ताने रामशेठ बोलू लागले....

'आयुष्याची ७० वर्षे पूर्ण करत असताना फार मोठा असा हा एक कालखंड म्हणजे हा एका धडपडीचा कालखंड आहे. गरीब घरात जन्माला आल्यानंतर ज्या-ज्या हालअपेष्टा सहन कराव्या लागतात, त्या-त्या हालअपेष्टा सहन करत-करत माझं बालपण गेलं आहे.

वयाच्या पाचव्या वर्षापासून माझं कष्टाचं आयुष्य सुरु झालं. आईला चुलीसाठी लाकडं आणून दे, ती लाकडं फोडून दे, विहिरीच पाणी ओढून दे अशी सगळी कष्टाची कामं पाचव्या वर्षापासून सुरु झाली आणि बालपणाला कष्टाची जोड मिळाली. आजतागायत हा संस्कार कायम आहे. हा संस्कार असा आहे की, आज घरात हवे तेवढे नोकरचाकर असताना सकाळी उठल्यानंतर माझ्या अंथरुण-पांघरुणाची घडी मीच करतो.. हे सगळे आईचे संस्कार आहेत.

■ तुम्ही शिक्षक होतात...

**मी म्हटले,**

'शिक्षक म्हणूनच आयुष्य सुरु झालं...' रामशेठ सांगू लागले.... 'सामान्य कुटुंबातील एखादा माणूस एखादी नोकरी मिळाली की, अतिशय खूश होतो. त्याप्रमाणे शिक्षकाच्या नोकरीमध्ये मी अतिशय चांगल्यारितीने खूश झालो. कारण, मला शिक्षकी पेशाची आवड होती आणि आवडीने तो पेशा मी स्वीकारलेला होता. १९७२ साली मी बी.ए. झालो. १९७३ मध्ये मी बी.एड.पूर्ण केलं. १९७३ साली पनवेलच्या 'विठोबा खंडाप्पा' हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून मी कामाला लागलो. त्याच वर्षी माझा विवाह झाला. आजचा आमदार प्रशांत ठाकूर याचा जन्म १९७४ चा. १९७४ सालापासून १९७६ सालापर्यंत मी वाशी येथे शिक्षक म्हणून होतो.

नंतर परिस्थिती बदलत गेली. त्यावेळी वाटायला लागलं की, शिक्षकी पेशामध्ये जीवनाची गुजराण

**माझे आई-वडील भाविक होते. वडिलांची पूजा सकाळी उजाडायच्या आत सुरु व्हायची आणि ती तास-दीड तास चालायची. आईची तेवढीच पूजा असायची. सकाळी उठलं की अंगण झाडायचं मग काकड आरती सुरु व्हायची. संतांचे अभंग म्हटले जायचे त्या प्रसन्न वातावरणात माझं बालपण घडलं. कष्टाची, मेहनतीची सवय झाली आज मी 'रामशेठ' झालो तरी, आई-वडिलांच्या संस्कारामुळे बिछान्यातून उठल्यावर अंथरुण-पांघरुण तसच ठेवत नाही. त्याच्या घड्या करुन ठेवतो. हे संस्कार आईवडिलांचे आहेत.**

लोक मला दानशूर म्हणतात पण हा संस्कार कर्मवीर भाऊरावअण्णा आणि आमच्या कॉलेजचे त्यावेळचे प्राचार्य यांच्याकडून मला मिळाला आहे. अण्णा मुलांकडून काम करुन घ्यायचे आणि मुलांना खाऊ द्यायचे. साताऱ्याचे आमचे प्राचार्य ज्या मुलांकडे साबू नाही, तेल नाही, कोणाला अंथरुण-पांघरुण नाही. त्यांना पैसे द्यायचे. या सगळ्याचा माझ्यावर परिणाम झाला. त्यामुळे आपल्याला जे मिळाले आहे. ते आपण देत राहिले पाहिजे. या भावनेने मी काम करतो. जनार्दन भगत साहेबांचेही माझ्यावर हेच संस्कार आहेत.

व्यवस्थित होऊ शकत नाही. शिक्षकाला जो मानसन्मान समाजाने द्यायला पाहिजे, तो अतिशय कमी होत चालला आहे. मग आपण उद्योग-व्यवसायात पडावं, काही तरी करुन दाखवावं, आपणही ते करु शकतो. ज्या आदर्शाने या पेशात गेलो होतो, तो आदर्श जपताना एखाद्या वेळेस किंमत मिळत नसेल तर ठीक आहे. जे शिक्षण चाललेलं आहे, त्याप्रमाणे चाललेलं आहे. मग, एक मोठी उडी घ्यावी असं वाटलं आणि त्याप्रमाणे व्यवसाय चालू केला. छोटीमोठी १० ते १२ हजारांची काम करत असताना मग कोट्यवधींची कामं करायला लागलो. मग ही कामं १९७६ सालापासून ते १९९८ सालापर्यंत करत राहिलो.

१९७२ साली सिडकोने वाशी येथे घरे बांधली. २२ हजार रुपयांत ते घर होतं ते मी घेतलं, त्याकरिता १८ हजार कर्ज काढले. ४ हजार रुपये कसे तरी जमवलं. त्यावेळी वाशीला पिठाची चक्की नव्हती, दळण आणायला लांब जावं लागायचं. माचीस आणायची म्हटले तरी वाशी गावात चालत जायचं. आता नवी मुंबई महानगरपालिका क्रमांक १ ची महानगरपालिका बनली, तेव्हा ती स्थिती होती. सिडकोने सिडकोच्या विकासावर एक निबंध स्पर्धा ठेवली होती. त्यात मी भाग घेतला आणि मला शंभर रुपयाचं पहिल बक्षीस मिळालं.

## ■ "आणि मग राजकारणात कसे ओढले गेलात... '?

राजकारणापासून मी बराचसा लांब राहिलो होतो. राजकारणात होतो, असून नव्हतो. कारण, प्रत्यक्ष निवडणूक लढवत नव्हतो. माझे वडील आणि चुलते शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते असल्यामुळे माझ्या घरात शे.का.पक्षाचे वातावरण होते. अगदी मला समजायला लागलं, तेव्हापासून मी शे.का.पक्षाचाच कार्यकर्ता होतो. त्याच्यानंतर १९९८ साली, म्हणजे मी व्यवसायामध्ये साधारण १९७६ ला पडल्यानंतर २२ वर्षांनी प्रत्यक्ष राजकारणामध्ये आलो. तोपर्यंत जिल्हा परिषद,

मी जेव्हा खासदारकीच्या निवडणुकीला उभा राहिलो तेव्हा आमची आगरी-कोळ्यांची एकवीरा देवी आहे. तिला कौल लावला, तो कौल उभा राहण्याच्या बाजूने आला. माझ्याविरोधात माजी मुख्यमंत्री अंतुले होते, दुसरीकडे कोळी समाजाचे अनंत तरे होते, तेव्हा ते ठाण्याचे महापौर होते. आता हा जो कौल लावला असं मी म्हटलं ती काही भाबडी अंधश्रध्दा नाही. काहीवेळा या सात्विक श्रध्दा आपल्याला उभारणी देत असतात. त्याच भावनेनं मी या घटनेकडे पाहतो. मी अंधश्रध्दा पाळत नाही. पण जगात एक नियंत्याची शक्ती आहे.

पंचायत समिती, आमदारकी, खासदारकी ज्या निवडणुका शेतकरी कामगार पक्ष लढवत होता, त्यामध्ये हिरिरीने भाग घेत होतो आणि वरच्या स्तरावर मा. लोकनेते दि.बा. पाटीलसाहेब किंवा मा. एन.डी. पाटीलसाहेब, माझे सासरे माननीय जनार्दन भगतसाहेब हे सगळे माझे आदर्श होते. जनार्दन भगतसाहेबांच्याच कन्येशी माझं लग्न १९७३ साली झालं म्हणजे १९७३ सालापासून भगतसाहेब यांच्या नेतृत्वाखाली मी काम करत होतो. मग, त्या मधल्या काळामध्ये कुठल्या मार्केट यार्डाच्या निवडणुका झाल्या, सभापती व पंचायत समितीच्या निवडणुका झाल्या, जिल्हा परिषद निवडणुका झाल्या. ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या किंवा विवेक पाटलांच्या दोन-तीन आमदारकीच्या निवडणुका झाल्या,

१९७८ ते १९९८ अशी २० वर्षे मी ठेकेदारीची कामं करीत होतो. लोकसभा निवडणुकीचा विषय आला आणि मला उभं राहायला सांगण्यात आलं. मी म्हटलं विवेक पाटील तुम्ही राहा, जयंत पाटील तुम्ही राहा...पण ते म्हणाले तुम्हीच निवडून येऊ शकतात. मला दगड-माती भराव या कामाचा थोडा कंटाळाच आला होता. म्हटलं चला, अनुभव घेऊ या आणि उभा राहिलो. त्याच काळात मी अनेक छोट्या -मोठ्या देणग्या देत होतो. लोकांना वाटलं पद नसताना एवढी मदत करतोय. पद मिळाल्यावर किती मदत करेल... आणि लोकांनी मला विजयी केलं.

दत्तूशेठच्या निवडणुका झाल्या, या सर्वांमध्ये सक्रिय भाग घेत होतो. मी जरी १९७३ ला नोकरीला लागलो, १९७६ला व्यवसायात पडलो तरी मला आठवतंय, साधारणतः १९७८-७९ च्या सुमारास ज्या निवडणुका झाल्या, तेव्हापासून माझा सहभाग हा राजकारणामध्येही महत्त्वाचा होता. फक्त त्यांच्यामध्ये असूनसुद्धा त्यांच्यापासून मी अलिप्त होतो. काही कालावधीमध्ये १९९५ च्या निवडणुकीत किंगमेकर म्हणून मी होतो. ज्या काळात विवेक पाटील आमदारपदाच्या निवडणुकीला उभे राहिले, त्या वेळच्या निवडणुकीत माझी भूमिका किंगमेकरचीच होती. त्यांच्या अगोदरसुद्धा पंचायत समिती, जिल्हा परिषद या निवडणुकांमध्येही मी जोराने काम करत होतो आणि १९९८ ला अचानक राजकारणात आलो.

■ **मग आपण प्रत्यक्ष राजकारणात कधी आलात ?**

'१९९८ मध्ये मला शेकापक्षाने थेट लोकसभेलाच उभे केले. माझी तयारी नव्हती. पण, सांगण्यात आलं की, 'तुम्ही दिल्लीमध्ये जाऊन राजकारण करा. आम्ही इथलं सांभाळायला तयार आहोत.



इथली तुम्हाला काळजी नको'. पण, मी दिल्लीला खासदार म्हणून निवडून गेल्यानंतरसुद्धा मी इथलं बारीकसारीक राजकारण बघू लागलो.

सोमवार ते शुक्रवार मी दिल्लीत असायचो. सोमवारी विमानाने जायचो आणि शुक्रवारी विमानाने परत यायचो. शनिवार, रविवार मतदारसंघात असायचो. दिल्लीसाठी मी माझी पनवेलची गाडी मागवून घ्यायचो. मग गाडी अशा बेताने पनवेलहून निघायची की, दिल्लीच्या विमानतळावर मला घ्यायला गाडी हजर असायची. लोकसभेच्या दोन निवडणुका मी लढवल्या. पहिली निवडणुक बॅ. अंतुलेसाहेब यांच्याविरुद्ध. यापूर्वी शेतकरी कामगार पक्षातर्फे रायगड लोकसभा मतदारसंघात मा. दत्ता पाटील दोनदा निवडणूक लढले होते आणि दोन्ही वेळा पराभूत झाले होते. १९८४ साली मा.दि.बा. पाटीलसाहेब एकदा निवडणूक लढले होते आणि बॅ. अंतुलेसाहेबांना पराभूत करुन विजयी झाले होते. परंतु, १९९९ ला माझ्याविरुद्ध तेही पराभूत झाले. माझ्यावर जबाबदारी टाकण्यात आल्यानंतर कार्यकर्त्यांच्या पाठिंब्याने मी दोन्हीवेळा विजयी झालो. बॅ.अंतुलेसाहेबांच्याविरुद्ध ८-१० हजार मतांनीच विजयी झालो होतो. पण,

**दोन निवडणुका लढल्यानंतर मी ठरवलं आता निवडणुकीला उभं राहायचं नाही. गावात जाऊन गावाचं काम करु. शरद पवार साहेबांनी दिल्लीत मला विचारलं... रामशेठ 'तुम्ही उभे राहत नाही का'? मी म्हटलं 'साहेब माझी हौस भागलीय' आमदारकीला उभं राहा म्हटलं त्यालाही नाही सांगितल. माझा मुलगा प्रशांत उभा राहील, हे मान्य आहे का? आणि सर्वांनी ते मान्य केलं. दरम्यान विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना त्यांनी आग्रह केला आणि काँग्रेस पक्षात गेलो आणि ती निवडणूक जिंकली.**

मा.दि.बां.पाटीलसाहेबांच्या विरोधात ७५ हजार मतांनी निवडून आलो. या दोन्ही नेत्यांच्या विरोधात मी निवडणूक जिंकलो असलो तरी मला हे सांगताना अजिबात संकोच वाटत नाही की, राजकारणातील हे दोन्ही नेते माझे अत्यंत आदराचे स्थान आहे. मा. दि.बा. पाटीलसाहेब होते तिथपर्यंत आणि आजही त्यांच्याबद्दल माझ्या मनात आदर आहे. बॅ.अंतुलेसाहेब तर आमचे नेतेच होते. पण, मला एक समाधान असे आहे की, खासदार म्हणून काम करताना खासदारफंडाचा उपयोग मी जिल्ह्यात इतक्या कामांकरिता केला की, असा फंड कोणी वापरला नसेल. पहिल्यांदा खासदार झाल्यानंतर लगेच एक सत्वपरीक्षा समोर उभी राहिली. अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार विश्वास ठराव घेऊन सभागृहात आले आणि माझ्या एका मताने ते सरकार पडले. जर मी त्यांना मत दिले असते तर सरकार पडले नसते आणि त्या बदल्यात मला मंत्रीपद मिळणार होते. नंतरच्या निवडणुकीत माझ्याविरोधात भाजपा किंवा एनडीए उमेदवार उभा करणार नाही, असे आश्वासन मला देण्यात येत होते. परंतु, माझं मन मला सांगत होतं की, आपण डाव्या राजकारणात वाढलो आहोत म्हणून सरकारच्या बाजूने मत देणे तर अजिबात योग्य ठरणार नाही. कोणाहीविषयी अनादर व्यक्त न करता, मी माझ्या मतावर ठाम राहिलो. माझे मत वाजपेयींच्या विरोधात टाकलं. वाजपेयी सरकार पडलं. पुढचा सगळा इतिहास लोकांना माहीत आहे.

२००४ च्या विधानसभा निवडणुकीत मला काँग्रेस पक्षाकडून आमंत्रण आले होते. मी विधानसभेला उभे राहावे, असेही सांगण्यात आले होते. त्यावेळचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे मला निरोप होते, फोन होते. पण, मी शे.का.पक्षातल्या माझ्या सहकाऱ्यांना शब्द दिला होता की, २००४ च्या निवडणुकीपर्यंत मी कुठेही जाणार नाही. या २००४ च्या निवडणुकीत पनवेल विधानसभा मतदारसंघातून विवेक पाटील यांना निवडून आणण्याकरिता मी सगळी ताकद पणाला लावली. त्या वेळी ही सगळी मंडळी माझ्याबद्दल काय बोलत होती, ते त्यावेळचे 'रायगड टाइम्स'चे अंक काढून बघा. हेच विवेक पाटील सांगत होते की, 'राम'बाण औषध वापरल्याने विवेक पाटील पनवेल विधानसभा निवडणूक जिंकणारच.' ही निवडणूक पार पडल्यानंतर मग मी माझा राजकीय निर्णय करायला मोकळा होतो आणि त्यानंतर मी काँग्रेसमध्ये आलो. **राजकारणात वावरताना मी कधीही स्वार्थासाठी वावरलो नाही किंवा कोणाचा द्वेष करुन वावरलो नाही.** परंतु, राष्ट्रीय प्रवाहात येऊन पनवेल, उरण, आणि रायगड जिल्ह्यात फार मोठी विकासकामे उभी करावी, या भावनेने मी काँग्रेसमध्ये दाखल झालो. सांगायला आनंद वाटतो की, प्रशांतच्या नगराध्यक्षपदाच्या काळात आणि नंतर तो आमदार झाल्यावर पनवेलच्या इतिहासात झाली नाही एवढी कामे आम्ही त्या ४-५ वर्षांत उभी केली आहेत.

काँग्रेसमध्ये आल्यानंतरही माझ्यापाठी सातत्याने असा आग्रह होता की, 'मी निवडणुकीला उभे राहावे.' पण, मी स्पष्ट केले होते की, 'मला आता थेट निवडणुकीत उभे राहायचे नाही'. २००९ ची विधानसभा निवडणूक हे माझे लक्ष्य होते. प्रशांतला निवडून आणणे, यासाठी सगळी आखणी केली होती २०१४ च्याही निवडणुकीची आखणी केली होती. त्या सालातील लोकसभा निवडणुकीला मला उभे राहायला सांगत होते. मध्यंतरी ऑक्टोबर महिन्यात राहुल गांधी यांच्या

कार्यालयातून फोन आला. राहुलजींनी मला भेटायला बोलावले आहे, असा निरोप मिळाला. सुरुवातीला तो फोन खरा आहे, असे वाटले नव्हते. परंतु, पुन्हा फोन आला आणि तुघलक रोडवर भेटीची वेळ ठरली. तिथे राहुलजींची भेट झाली. त्यांनीही निवडणुकीला उभे राहण्याचा विषय काढला. अखिल भारतीय ओ.बी.सी. संघटनेच्या अध्यक्षपदाचा विषय काढला. त्यांनी मला आग्रह केला की, 'मी लोकसभेला उभे राहावे,' पण मी माझे क्षेत्र ठरवून घेतले होते. पक्षासाठी काम करायचे, पण प्रत्यक्ष निवडणूक लढवायची नाही, हे धोरण ठरवून मी काम करत होतो. पनवेल, उरण आणि रायगड जिल्हा हे मी क्षेत्र ठरवले आहे.

**आज मी भाजपामध्ये आहे, मी काँग्रेसमध्ये आल्यानंतर माझं भाग्य असं की, देशात काँग्रेस पक्ष सत्तेवर आला. राज्यात सत्तेवर आला. २०१४ ला राज्यात भाजपा सत्तेवर होता. आज देशात भाजपा सत्तेवर आहे. महेंद्र घरत नेहमी सांगतात. रामशेठ ज्या पक्षात जातील तो पक्ष सत्तेवर असतो. यातला गमतीचा भाग सोडा. पण, राजकीय भूमिकेतून मला असं वाटतं की, मी नेहमी विकासाच्या बरोबर राहिलेलो आहे. सिडकोनं शेतकऱ्यांच्या जमिनी भाव द्यायला विरोध केला तरी, सिडकोनं विकास केला या मताचा होतो, म्हणूनच माझा शेकापक्षासोबत मतभेद झाला होता आणि काँग्रेसमध्येही एका टोलनाक्याच्या टोलवरुन मी लोकांच्यासोबत राहिलो आणि भाजपामध्ये गेलो. आज मी, प्रशांत आणि परेश भाजपामध्ये आहोत. प्रशांत तर रायगड जिल्हा भाजपाचा अध्यक्ष झालेला आहे. २०१४ ला भाजपाची सत्ता आल्यावर त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सिडकोचे अध्यक्षपद प्रशांतला दिले. सिडकोच्या प्रकल्पग्रंस्तापैकी पहिल्यांदा हे पद त्या परिसरातील व्यक्तीला मिळाले होते.** ■



याच घरात न्हावाखाडी येथे २ जून १९५१ रोजी रामशेठ यांचा जन्म झाला.




# पुत्र सांगती चरित पित्याचे....

**'प्रशांतशेठ, तुमचे बाबा ७० वर्षांचे होत आहेत. लहानपणापासून तुम्हाला आठवणारे बाबा, तुम्हाला घडवणारे बाबा, नगराध्यक्ष आणि आमदारपदाच्या निवडणुकीत तुमच्यामागे पहाडासारखे उभे राहणारे बाबा...' आज तुम्ही तुमच्या बाबांबद्दल बोलावं. तुम्ही त्यांना 'आप्पा' म्हणता त्या आप्पांबद्दल .... आणि आमदार प्रशांत ठाकूर अगदी ओघवत्या भाषेत आपल्या पित्याबद्दल बोलू लागले... मी ऐकत होतो. ग.दि.माडगूळकरांच्या गीतरामायणाच्या ओळीच नजरेसमोर आल्या...**

**'पुत्र सांगती चरित पित्याचे....'**
**ज्योतीने तेजाची आरती...**

**तर वाचू या... आमदार प्रशांत ठाकूर काय सांगताहेत आपल्या आप्पांबद्दल..**

खरेतरं रामशेठ ठाकूर यांचा मुलगा असणं ही माझ्या दृष्टिकोनातून एक भाग्याची गोष्ट आहे. मी साधारणपणे जेव्हापासून समज आहे त्या काळापासून जे चित्र पाहतो आहे. पनवेल शहरातला माझा जन्म आहे आणि सुरुवातीच्या कालावधीमध्ये रामशेठ ठाकूर साहेब जेव्हा नव्या मुंबईमध्ये वाशीला शिक्षक म्हणून शिकवत होते, त्या कालावधीमध्ये ते ज्या शाळेमध्ये शिकवत होते, त्या शाळेमध्ये मला विद्यार्थी म्हणून ॲडमिशन त्यांनी घेऊन दिली. इंडियन एज्युकेशन सोसायटीची ती शाळा होती. त्या काळातली जी परिस्थिती होती. दिवंगत लोकनेते दि.बा.पाटील साहेब यांच्या नेतृत्वाखाली सिडकोच्याच विरोधामध्ये आंदोलन आकाराला येतं होतं , त्यावेळी माझे वडील उद्योजक म्हणून काम करीत होते. तरीसुद्धा आपल्या नेत्यांच्या बरोबरीने आपल्या शेतकऱ्यांच्या हितासाठी जेजे कराव लागेल ते ते

केलं पाहिजे यासाठीची त्यांची धडपड होती. माझ्या आईचे वडील जनार्दन भगत साहेब हे दि.बा. पाटील साहेबांचे सहकारी आणि त्यामुळे त्यांच्या बरोबरीने कै.दत्तुशेठ पाटीलसाहेब यांच्याबरोबरीने या सगळ्या सिडकोच्या विरोधातील लढ्यामध्ये काम करत असताना, आपल्या सहकाऱ्यांच्या सोबत काम करायचंय या भावनेतून त्यांनी आंदोलनात भाग घेतला. ते एकीकडे स्वतःला किंवा स्वतःच्या व्यवसायात स्थिर होण्यासाठी प्रयत्न करत होते. त्यांनी स्वतःला झोकून देऊन काम करताना मी त्यांना पाहिलेलं आहे. म्हणजे दिवस- दिवस ते काम करत असायचे. मला कधी आठवत नाहीत की दुपारच्या वेळेमध्ये वडील कधी घरी आले आणि त्यांनी विश्रांती घेतली असं बघितलं नाही. त्यामुळे सातत्यानं काम करत राहणं आणि ते वर्कोहोलिक असा जो एक इंग्रजी भाषेतला शब्द आहे तशा पद्धतीने ते सतत कामामध्ये मग्न झालेलेच मी सुरुवातीच्या काळामध्ये पाहिले. पण हे सगळं होत असताना शालेय जीवनामध्ये मला आठवतं की कधीतरी कुटंबासाठी ते वेळ देत होते. मग आम्हाला कुठेतरी फिरायला घेऊन जात होते. वाढदिवसाच्या निमित्ताने वर्षातून एकदा कधीतरी सुटीसाठी बाहेर जाणं असेल, यासाठीसुद्धा त्यांनी वेळ दिलेला आहे. मला सर्वसाधारपणे असं नेमक आठवत नाही की वाचनाची आवड कशी लागली? पण ती वाचनाची आवड जोपासण्यासाठी त्यांनीच मला सवय लावली. त्यावेळेला कोकाटे क्लास प्रसिद्ध होते. ते फाडफाड इंग्लिश बोलायचे आणि मग त्यांची जाहिरात असायची 'आठवडाभरात इंग्रजी शिका', मग कधीतरी '२४ तासांत इंग्रजी शिका' मग अशी सगळी पुस्तके जी-जी मी मागितली, ती मला वडीलांनी आणून दिली. माझ्याशी घरी ते इंग्लिश भाषेमध्ये संवाद साधायचे की जेणेकरून माझे इंग्लिश सुधारेल. मग, त्याच्यातल्या चुका दुरुस्त करणं हे सगळं त्यांनी केलं. कधी मुंबईला फिरायला गेले तर आवर्जून नाटकांना आम्ही हजे-या लावलेल्या आहेत. 'नाटकं पाहणं' ही त्यांची आवड आहे. पुस्तकांच्या प्रदर्शनामध्ये घेऊन जाणं, त्या दुकानातून पुस्तक विकत घेऊन देणं, त्या पुस्तकांची माझी आवड ते शिक्षक म्हणून हे सगळ ते करत असतं. पण मी वाचन करतोय हे बघितलं की, त्या दृष्टीने मला प्रवृत्त करणं, पुस्तक विकत घेऊन देणं. या



**मी लहान असताना बाबा हे प्रत्यक्ष राजकारणात नव्हते. १९९८ साली त्यांनी पहिल्यांदा लोकसभेची निवडणूक लढवायची असे ठरवले. तोपर्यंत मी शिक्षण पूर्ण करीत होतो आणि त्यांच्यानंतर व्यवसाय पाहत होतो.**

सगळयाच बाबतीमध्ये त्यांनी सातत्याने उत्साहाने सहभाग घेतलेला मी अनुभवला मिळाला. नंतरच्या कालावधीमध्ये आपल्या हाताशी पैसा आलायं तर तो पैसा आपल्यापुरता न ठेवता तो समाजासाठी कसा देता येईल, या दृष्टिकोनातून त्यांनी सतत विचार केला. नाती जोपासत असताना मी असेन

किंवा परेश असेल, आम्हाला त्या-त्या नात्यांमध्ये ज्या ठिकाणी आवश्यक आहे, त्याठिकाणी वेळ देणं घरातल्या कार्यक्रमांसाठी हजेरी लावणं, त्याच्यामध्ये सहभागी होणं, या दृष्टिकोनातून त्यांनी आम्हाला सातत्याने एक संस्कार केलेला आहे. असं मी म्हणेन आणि म्हणून मला वाटतं की सर्वच स्तरावर मग त्यामध्ये सामाजिक स्तरावर असेल, त्याच्याबरोबरीने व्यावसायिक स्तरावर असेल किंवा मग कौटुंबिक स्तरावर या सर्वच बाबतीमध्ये त्यांनी सातत्याने आपल्यातलं वेगळेपण जपण्याचा आणि त्याचबरोबर कुटुंबाला समृद्ध करण्याचा हा त्यांचा प्रयत्न सातत्याने वाढवत नेला.

मला आठवतंय की इयत्ता चौथीपर्यंत निरनिराळ्या गोष्टींसाठी मी त्यांचा मारसुध्दा खाल्लेला आहे. आमच्या पिढीपर्यंत आई-वडिलांचा असा 'प्रसाद' अनेक घरातून मुलांना मिळालेला आहे. तो चांगल्यासाठीच होता. म्हणजे ते 'छडी लागे छम छम' हे आमच्या पिढीपर्यंत ते लोकप्रिय अशा पद्धतीचे होतं आणि काहीवेळा आवश्यकही होतं. निरनिराळ्या कारणांसाठी मी त्यांचा मार चौथीपर्यंत खाल्लेला आहे. अगदी कुठलीही गोष्ट असेल आणि सर्वसाधारणपणे चुकलो आहे म्हणून नाही, पण त्याचत्याच चुकांची पुनरावृत्ती केली आणि कुठेतरी आळशीपणा केला किंवा जाणूनबुजून हट्टीपणा केला तर अशावेळेला निश्चितपणाने मला तो प्रसाद मिळालेला आहे. मला असं वाटतं की त्या 'छडी लागलेला छमछम' मुळेच मी घडत गेलेलो आहे. आई असेल किंवा धाकटा भाऊ परेश असेल, यांच्याबरोबरीने अन्य कुटुंबातल्या अन्य व्यक्ती आहेत त्यांनी स्वतःच्या पायावर उभं राहावं, याच दृष्टिकोनातून त्यांना केलेली मदत असेल हे सगळंच मी पाहिलेलं आहे. मला वाटतं की सर्वसाधारणपणे एकाच वेळेला इतकी अवधानं ठेवता येणार नाहीत, हे सर्वसाधारणपणे प्रत्येक व्यक्तीला शक्य होत नाही. पण वडिलांनी त्या दृष्टिकोनातून जाणीवपूर्वक आम्हाला घडवलं आहे आणि त्या दृष्टिकोनातून आम्हीही त्यातून शिकावं, असा त्यांचा सातत्याने प्रयत्न होता.

■ **'व्यवसाय आणि राजकारण.. यांची सांगड कशी घातलीत... ' या प्रश्नावर तेव्हा आमदार नसलेले प्रशांत ठाकूर यांनी नेमकं विश्लेषण केलं.**

'माझ्याबाबातीत बोलायचं झालं तर त्यावेळेला बाबा हे प्रत्यक्ष राजकारणात नव्हते. म्हणजे १९९८ साली त्यांनी पहिल्यांदा लोकसभेची निवडणूक लढवायची असे ठरवले. तोपर्यंत शिक्षण आणि त्यांच्यानंतर मी व्यवसाय पाहत



होतो. सामाजिक काम पाहायला साधारणपणानं ९५ पासून प्रत्यक्षरित्या मी सुरुवात केली ९५च्या विधानसभा निवडणुकीपासून आणि त्यानंतर ते पाहता-पाहता व्यवसायाकडे लक्ष राहिले पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष होता. राजकारणातल्या जबाबादा-या जेव्हा सुरु झाल्या, त्यावेळेला मग निश्चितपणानं त्यांचा आग्रह होता की मी व्यवसायाकडे पूर्णपणाने लक्ष द्याव आणि त्यानंतर राजकीय किंवा अन्य जबाबदाऱ्या उचलाव्यात. सामाजिक दृष्टिकोनातून त्यांची कधी आडकाठी केली नाही. १९९५ च्या सुमारास आम्ही 'रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'ची स्थापना या परिसरातील श्री. महेंद्र घरत किंवा त्याचबरोबर अरुणशेठ भगत यांच्याबरोबरीने स्थापना केली आणि मग सुरुवातीला जनार्दन भगतसाहेबांची कर्मभूमी गव्हाण परिसर, त्या परिसरामध्ये आम्ही शालेय विद्यार्थ्यांसाठी मदतीचे कार्यक्रम घेतले. त्यामध्ये वह्या-पुस्तकांचे वाटप असेल, गणवेश वाटप असेल, अन्य वेगवेगळया कार्यक्रमांना अशी सुरुवात केली. हे असे सगळे कार्यक्रम त्याच्या आधीही सुरु होते.

मंडळाच्या माध्यमातून हे सुरु झाल्यानंतर ते कार्यक्रम करणं, ते कार्यक्रम पुढे तालुकाभर पसरवणं, या दृष्टिकोनातून वडिलांनी कधी आडकाठी केली नाही. पण राजकारणात मात्र भाग घेत असताना, सामाजिक काम करावं, जरुर करावं, व्यावसायिक काम करावं, जरुर करावं पण ते करत असताना व्यवसायाकडे दुर्लक्ष होऊ नये, याकडे त्यांचा सातत्याने कटाक्ष असायचा. ज्यावेळेला मी प्रत्यक्षरित्या पनवेल नगराध्यक्षपदाची निवडणूक लढवली आणि त्यावेळेला मी हळूहळू व्यवसायाला तितकासा वेळ देता येणं मला शक्य झाल नाही, याची त्यांना जाणीव झाली. त्यावेळेला राजकारणात असलेली स्पर्धा आणि त्या स्पर्धेमुळे राजकीय घडामोडी, राजकीय कामासाठी द्यावा लागणारा वेळ, हे पाहता मला व्यवसायाला तितकासा वेळं देता येणार नाही, हे वडिलांनीही जवळपास मान्य केले होतं. आणि मग स्वतःहून त्यांनी व्यवसायामध्ये लक्ष घातलं शिवाय धाकटा भाऊ परेश याच्याबरोबरीनं व्यवसाय चौफेर पध्दतीने वाढवला. आम्ही राजकारण असेल किंवा व्यवसाय असेल या सर्वांमध्ये जे काही यश मिळालं ते बाबांनी जे आजवर काम केलंय त्या कामाची ती पुण्याई आहे आणि त्याचबरोबर कुठलेही काम करायचं, कुठलीही लढाई लढायची तर ती पूर्ण तयारीनिशी हे त्यांचं धोरण राहिलेलं आहे. आणि मग त्या दृष्टिकोनातून पूर्णपणे झोकून देऊन त्यांनी त्या- त्या लढाईमध्ये सातत्याने भाग घेतलेला आहे. आणि त्यांनी यामुळे आम्हाला कधी बेसावध राहू दिलं नाही, ते स्वतः कधी बेसावध राहिले नाहीत. मग नगरसेवकपदाची निवडणूक असू दे, किंवा नगराध्यक्षपदाची निवडणूक असून किंवा आमदारपदाची निवडणूक असु दे. त्याप्रत्येकवेळी बाबांच काटेकोरपणे लक्ष राहिलेलं आहे. आणि म्हणून त्या सर्व लढाया आम्ही जिंकलेल्या आहेत. त्याचे श्रेय बाबांच्या अचूक मार्गदर्शनाला आणि त्यांच्या राजकीय नियोजनाला आहो.

एकीकडे एक पक्ष जो १९५७ सालापासून सातत्याने तिथं विधानसभेवर ती जागा राखून राहिलेला आहे. त्या पक्षाशी टक्कर देणं हे सहज साध्य नव्हतं. मग त्या दृष्टिकोनातून जे जे करणं आवश्यक आहे, जी जी पाऊलं उचलणं आवश्यक आहे ती पाऊलं उचलण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी ते प्रयत्न केले. मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि उद्योगमंत्री नारायण राणे साहेबांची एकत्रितरित्या सभा होणं, आणि ती पहिली सभा पनवेलमध्ये होणं, त्याच निवडणुक प्रचारात राहुल गांधीची पनवेलला सभा होणं ते पहिल्यांदा पनवेलला येणं. या सर्व ज्या गोष्टी जुळून आल्या आणि त्यामुळे मला असे वाटते की, विधानसभेच्या बाबतीमध्ये ते सगळंच अभूतपूर्व अशा पध्दतीचे होतं. आणि मला असं वाटतं की तिथूननंतर पुढच्या कालावधीमध्ये लोकांच्या संपर्कात राहणं, लोकांच्या अपेक्षांच्या अनुरुप काम करणं, त्याला पूर्ण करण्यासाठी पुन्हा झोकून देऊन काम करणं हे जे आहे ते सतत आम्हा भावांच्या मनावर वडिल बिंबवत राहिले, आम्ही त्यांना घरात आप्पा म्हणतो! आम्ही जे काही आहोत, ते आज आमच्या वडिलांमुळे आहोत. त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय, पाठिंब्याशिवाय हे शक्य नव्हतं.





**मला याचा आनंद आहे की, सिडकोचा अध्यक्ष म्हणून मी जेवढा काळ राहीलो त्यावेळेत लोकांचे प्रश्न समजावून घेणे, त्यांना न्याय मिळवून देणे या कामात कमालीचे समाधान वाटत राहीले. सिडको क्षेत्रातील शेतकऱ्यांना १२.५ टक्के प्लॉट मिळवून देण्याचा विषय मी बराच मार्गी लावला...**

■ **तुम्ही सिडकोचे चेअरमन होण्याअगोदर सिडकोचा मोठा लढा झाला आहे... काय सांगाल त्या लढ्याबद्दल ?**

सिडकोची स्थापना ही सत्तर सालाच्या आसपास झाली. त्या वेळेला नवी मुंबई परिसरामध्ये विकास व्हावा हे मुख्य धोरण होतं. त्यामध्ये रायगड जिल्ह्याचा काही भाग होता, ठाणे जिल्ह्याचा काही भाग होता, पनवेल तालुक्यामधील ३८ गावं होती, उरण तालुक्यातील २९ गावं होती, ठाणे जिल्हयातील २८ गावं होती. अशा ९५ गावांच्या विकासाची योजना होती. ठाणे जिल्ह्यातली बेलापूरपासून घणसोली आणि या सगळ्या परिसरातील जी गावं आहेत ही सगळी गावं या नव्या मुंबईसाठी संपादन करण्याचं ठरविण्यात आलं. दि. बा. पाटील साहेबांच्या नेतृत्वाखाली त्या वेळेला जो संघर्ष उभा राहिला, त्याच्यामुळे गावठाणं सोडून गावठाणच्या भोवतालचा सगळा परिसर, या सगळ्या परिसरातील जवळपास तीस हजार हेक्टर जागा ही संपादीत केली गेली आणि पुन्हा या परिसरातील १० हजार हेक्टरपर्यंत शासकीय जमीन या सगळ्या नव्या मुंबईसाठी संपादित झाली. पुढच्या काळात सिडकोने औरंगाबाद, संभाजीनगर इथे असेल, नाशिक येथे, नांदेड असेल अशा वेगवेगळ्या ठिकाणी जमीन संपादनाच काम केलं किंवा नागपूरमध्येही काही प्रमाणामध्ये, चिखलदऱ्याला हिल स्टेशन डेव्हलप करणे किंवा रायपूर या ठिकाणीसुद्धा सिडको गेली पण त्याचं प्रमाण फार कमी आहे. नवी मुंबईमध्ये जितकं सिडकोचे काम आहे तितके अन्य ठिकाणी नाही. नवीमुंबईमध्ये खरंतर मुंबईच्या 'प्राक्झिमीटी'मुळे या सगळ्या परिसरामध्ये सिडकोने जे काम केले आहे म्हणजे आपण म्हणू या नवं शहर उभं करण्याचे त्यात सिडको नुकसानीत राहिली नाही. सिडकोला या ठिकाणी चार पैसे मिळाले आहेत. या परिसरातील लोकांच्या सर्वंकष विकासासाठी म्हणून सिडकोने काम करणं अभिप्रेत होतं यासाठी इथले सर्वच नेते झगडत राहिलेले

आहेत. मग आता त्यासाठीच्या वेगवेगळ्या पध्दतीचे लढे करावे लागले. ८४ साली तर दि.बा. पाटीलसाहेबांच्या नेतृत्वाखाली जी लढाई लढली गेली, त्यात पाच हुतात्मे झाले. शेतकऱ्यावर गोळीबार झाला.

१६ जानेवारीला दोन हुतात्मे आणि १७ जानेवारीला तीन हुतात्मे झाले. मग मला असं वाटतं की या शेतकऱ्यांना आपला जो जीव गमवावा लागला त्यामुळे निश्चितपणाने या परिसरातील सगळ्या लोकांच्या मनामध्ये सिडकोविषयी अतिशय चीड असल्याची भावना होती. आणि पुढे सिडकोच्या माध्यमातून पुनर्वसन जे वेगाने व्हायला हवे होते ते वेगाने झाले नाही, याची सातत्याने लोकांच्या बोलण्यातून चडफड व्यक्त होत होती. नंतरच्या कालावधीमध्ये शहर विकसित होत गेली. पण प्रामुख्याने यातला टप्पा होता की शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला, जो अपेक्षित होता तो मिळत नव्हता. जो लढा लढला गेला तो एकरी १५ हजार रुपये सिडको द्यायला तयार झाली. आणि ३० हजार रुपये एकरी मागितले जात होते त्यासाठी लढा होता. शेवटी ते २७ हजार रुपये एकरी भाव मिळाला पाहिजे आणि त्याबरोबरीने अन्य १२.५ टक्के गावठाण मिळाले पाहिजेत, असा ९० साली निर्णय झाला. ९४ साली पवारसाहेब मुख्यमंत्री असताना त्या निर्णयाच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली. हे सगळं होत असताना या सगळ्या परिसरामध्ये जो विकास आहे, त्यामध्ये इथला जो तरुण आहे त्याला स्थान मिळालं पाहिजे, त्याला तिथे रोजगार मिळाला पाहिजे ही मुख्य मागणी होती. त्याची अंमलबजावणी अपेक्षित होती. ती झालेली नाही. सिडकोची जबाबदारी माननीय फडणवीस साहेबांनी माझ्यावर सोपवली आणि पहिल्यांदा प्रकल्पग्रस्तांपैकी एक अध्यक्ष झाला. मी २००९ सालापासून विधानसभेचा सदस्य म्हणून काम करत होतो. रामशेठ ठाकूर साहेबांनी लोकसभेचा सदस्य म्हणून १९९८ ते १९९९ व १९९९ ते २००४ असं काम केलं आणि आता २००९ पासून मी विधानमंडळात आमदार म्हणून काम करतो आहे. सिडकोच्या परिसरातील निरनिराळे प्रश्न मग ते ग्रामीण भागाशी संदर्भातले असू देत किंवा शहर वसाहतींच्या संदर्भातले असू देत, हे मला सातत्याने अनुभवायला मिळालेले आहेत आणि ते दीर्घकाळ सिडकोकडे मांडत असताना, विधानसभेत मांडत असताना एक संधी मला ते सोडवण्याच्या दृष्टिकोनातून मिळाली. मला आनंद आहे की जितका काळ मी अध्यक्ष पदावर राहिलो तितका काळ लोकांची गाऱ्हाणी ऐकणे, प्रश्न समजून घेणे आणि ते सोडविण्यासाठी सिडको अधिकाऱ्यांबरोबर बैठका आयोजित करणे, योग्य तो न्याय मिळवून देणे, या दृष्टीकोनातून मला प्रयत्न करता आले. विलासरावसाहेब मुख्यमंत्री असताना रामशेठ ठाकूर साहेबांनी त्यांच्याकडे मागणी केली होती की १२.५-टक्क्याचं वाटप पूर्ण करा. देशमुख साहेबांनी त्यावेळेला त्याला मोठ्या प्रमाणात गती दिली. पण त्यामध्ये ज्या अडचणी आल्या त्या पूर्ण होऊ शकल्या नाहीत. मी जेव्हा सिडकोचा अध्यक्ष झालो तेव्हा त्याच्यामधल्या अडचणी काहींना प्लॉट मिळाले पण प्रत्यक्षरित्या त्यांना त्याचा ताबाच मिळालेला नाही. आणि सिडको तर म्हणायचे की एकदा तुम्हाला आम्ही त्याचं ॲलॉटमेंट दिलं की संपल मग आम्ही तो प्लॉट बदलून देणार नाही. त्याबाबतीला निर्णय मला घेता आला, की हे प्लॉट बदलून देता येईल. वेगवेगळ्या टप्प्यावर आपण ते करू शकतो. हे सगळ्यात महत्वाचे आहे. सिडकोच्या माध्यमातून वेगवेगळ्या नागरी सुविधा दिल्या गेल्या पाहिजेत. मागच्या कालावधीपासून बरीचशी कामे मार्गी लागली नव्हती. मी अध्यक्ष झाल्यावर बैठका घेऊन ती कामे पूर्ण करुन घेऊ शकलो. पनवेल महापालिका २०१६ साली नव्याने स्थापन झाली. नवी मुंबई महापालिकेचा इतिहास जर आपण पाहिलात तर नव्या मुंबईला सोशल फॅसिलिटीचे प्लॉट हँड ओव्हर करत असताना प्रचंड कालावधी लागलेला आहे. मी सिडकोचा अध्यक्ष झाल्यावर मला ते जावणलं त्याच्या आधीही त्याची जाणीव असल्यामुळे लवकरात लवकर हे सामाजिक सोयीसुविधांचे भूखंड हस्तांतरित झाले पाहिजेत, यासाठी मी आग्रह धरला. सामाजिक सुविधा मग त्यामध्ये रस्त्यांपासून जे काही अन्य वेगवेगळ्या सुविधा असतील, यांचे हस्तांतरण झालं पाहिजे, यासाठी मी आग्रह धरला आणि मला खात्री आहे की मी अध्यक्ष असताना या दृष्टिकोनातून जो पाठपुरावा



केला आहे. त्यामुळे पनवेल महापालिकेच्या बाबतीत तरी फार विलंब लागणार नाही. अर्थात त्याला सिडकाचे गेल्या काही कालावधीमध्ये संजय भाटिया असतील, भूषण गगराणीजी असतील, नंतरच्या काळात लोकेशचंद्र यांचीसुद्धा मी चेअरमन असताना आणि ते एम.डी.असताना सकारात्मक भूमिका घेतली आणि त्यातून बऱ्यापैकी हे प्रश्न मार्गी लागले.

**'पद महत्वाचे नाही हा संस्कार बाबांकडूनच आला ना..' अगदी सहजपणाने 'हो' म्हणत प्रशांत ठाकूर म्हणाले, हा एकच संस्कार नव्हे तर सगळेच संस्कार त्यांनीच घडवले आहेत.**

जेव्हा मी लोकप्रतिनिधी म्हणून कामाला सुरुवात केली तेव्हा सगळ्यात पहिल्यांदा मी नगरसेवक म्हणून निवडून आलो आणि नगराध्यक्ष झालो. अडीच वर्ष मला नगराध्यक्ष म्हणून काम करता आलं. माझं भाग्य आहे की त्यावेळेला विलासराव देशमुखसाहेब मुख्यमंत्री होते आणि पनवेलमधला एक मोठा पूल बनला त्यावेळेला

**भाग्य आहे आमचं रामशेठ ठाकूर साहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही काम करतोय, पण त्या बरोबरीने त्यांनी जे राजकीय, सामाजिक क्षेत्रात केलेलं काम आहे, त्यांनी वेगवेगळ्या समाजातल्या मोठ्या स्तरावर काम करणाऱ्या लोकांशी जे संबंध जोडले त्यांच्यातून निश्चितपणाने पनवेलकरिता आम्हाला काहीतरी मिळवून देता आलं.**

पनवेलकरांच्या दृष्टिकोनातून खूप मोठा. त्यावेळी पनवेल एक नगरपालिका आणि त्याठिकाणी १८० कोटींचा पूल निर्माण होणं सहजसाध्य नव्हतं. भाग्य आहे आमचं रामशेठ ठाकूर साहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही काम करतोय पण त्या बरोबरीने त्यांनी जे राजकीय, सामाजिक क्षेत्रात केलेलं काम आहे, त्यांनी वेगवेगळ्या समाजातल्या मोठ्या स्तरावर काम करणाऱ्या लोकांशी जे संबंध जोडले, त्याच्यातून निश्चितपणाने पनवेलकरिता आम्हाला काहीतरी मिळवून देता आलं. स्वतःसाठी काही मिळवणं हा विषय नव्हता. पनवेलकरिता मिळवून देता आलं. विलासराव कार्यक्रमाला येतात काय, तो पूल कबूल करतात काय आणि एमएमआरडीएच्या माध्यमातून तो पूल उभा राहतो काय...पनवेल नगरपालिकाच होती पण त्यावेळेला खूप दीर्घकाळ पनवेलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जो पुतळा आहे. त्याच्याशेजारी डॉ.बाबासाहेबांच्या नावाचे भवन व्हावं अशी चर्चाच केवळ दीर्घकाळ चालू असायची. पण त्याला मुहूर्तस्वरुप काही प्राप्त होत नव्हतं. एकदा आम्ही विलासराव साहेबांकडे गेलो आणि ती मागणी केली त्यावेळेला संगीतराव म्हणून त्यांचे सेक्रेटरी होते त्यांच्याकडे गेलो आणि अगदी सहज साध्य झालं ते आज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भवन उभे राहिलेले आहे पनवेलमध्ये. हे सगळे जे चित्र पाहतो आहे, कधी एक क्षण आला की टोलवरुन एक मोठं आंदोलन उभं केलं आणि त्यानंतर ते आंदोलन करत असताना गडकरीसाहेब आले, त्यांनी सांगितले हे करुन देणार. पुढे देवेंद्र फडणवीससाहेब मुख्यमंत्री झाले आणि चंद्रकांतदादा त्या खात्याचे मंत्री. ते म्हटले की खूप मोठे नुकसान होईल हा टोल आपण रद्द केला तर पण देवेंद्र फडणवीस साहेबांनी सांगितले की आपण शब्द दिला आहे तो आपण पूर्ण केला पाहिजे आणि त्यांनी तो पूर्ण केला. तिथे आता लहान गाड्याना कुठलाही टोल लागत नाही. कमर्शियल व्यवसाय करतात त्यांना टोल लागतो. स्थानिक स्तरावर ही समस्याच मिटून गेली. मला असे वाटते की राजकारणामध्ये काम करत असताना केवळ आपण आपले आहे ते पद टिकवाव, खुर्ची टिकवावी याला रामशेठ ठाकूर साहेबांनी महत्व दिलं नाही आणि ते महत्व मी कधी देईन या दृष्टिकोनातून मला विचारही करु दिलेला नाही. पनवेलमध्ये काम करत असताना दिवंगत नेते दि.बा. पाटील साहेब असतील, माझे आजोबा जनार्दन भगत साहेब असतील यांना काम करताना बाबांनी पाहिलेले आहे. आणि त्यामुळे पद हे महत्वाचे नाही. आपल्यावर असलेली जबाबदारी महत्वाची आहे. आणि त्या जबाबदारीला न्याय देण्याचे काम करावे, कुठेही आपण अमरत्वाचा पट्टा घेऊन आलेलो नाही. त्यामुळे कुठल्याही पदाच्या बाबतीमध्येही ते विधान लागू पडते. सदासर्वकाळ तू आमदार राहावं असं मला काही वाटत नाही असे ते म्हणतात आणि माझ्याही मनामध्ये तशा पद्धतीची भावना नाही. पण आज राजकीय क्षेत्रामध्ये सातत्याने दिसत राहतं की कुरघोडीचं राजकारण हे लोकांच्या मनामध्ये इतके ठसतं गेलं आहे की लोकांचीही भावना तीच होती. अर्थात यातून बाहेर पडण्याच्या दृष्टिकोनातून समाजापुढे जेव्हा काही आदर्श निर्माण होतील त्याचवेळेला हे सगळं शक्य होणार आहे आणि या अनुषंगाने आपल्याला आपल्या स्तरावर जे चांगले करता येईल ते आपण करत राहावं, यासाठीच रामशेठ ठाकूरसाहेबांच्या नेतृत्वाखाली मी किंवा आमचे सगळे सहकारी मिळून आम्ही सगळे प्रयत्न करत आहोत. ज्या शहरात मी वाढलो त्या पनवेल शहराची आता महापालिका झालेली आहे. पनवेल महापालिका ही महाराष्ट्रातील २६ वी महापालिका आहे. त्यामुळे आता ही महाराष्ट्रात सर्वात तरुण महापालिका आहे. बाकीच्या महापालिकांच्या विकासाच्या बाबतीमध्ये स्पर्धा करावी आणि एक नवे मापदंड जे जे काही असू शकतील, विकासाच्या बाबतीमध्ये चांगल्या शहराच्या निकषाबाबतीतले ते सगळे मापदंड पनवेलने ओलांडावेत, या दृष्टिकोनातून काम करावं आणि हे करताकरता, जी अन्य जबाबदारी पडत राहील ती जबाबदारी निभवावी असेच माझ्या मनात आहे. ■



# ज्योतीने तेजाची आरती...

– परेश ठाकूर

**'परेशशेठ, तुमचे बाबा ७० वर्षांचे होत आहेत. लहानपणापासून तुम्हाला आठवणारे बाबा, व्यवसायाचं प्रशिक्षण देणारे बाबा, आणि तुम्हाला भावलेले बाबा.. तुम्ही आज तुमच्या बाबांबद्दल बोलावं काय सांगाल तुमच्या बाबांबद्दल... आणि पनवेलचे नगरसेवक परेश ठाकूर आपल्या वडिलांचे चरित सांगू लागले....**

मला आठवतंय की, मी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून कुटुंबाच्या उद्योगधंद्यात लक्ष द्यायला लागलो होतो. पहिल्या दोन-तीन महिन्यातच माझ्यावर ट्रॅफिक पोलिसासंबंधी एका कामाची जबाबदारी सोपवली होती. मला वारंवार सांगण्यात येवूनही मी मानापमानाच्या मुद्यामुळे त्या ठिकाणी प्रत्यक्ष जायला तयार नव्हतो. मला वडिलांनी पुन्हा एकदा त्याबाबत विचारणा केली. मात्र, माझी बोटचेपेपणाची भूमिका त्यांच्या लक्षात आल्यामुळे ते संतापून म्हणाले की, तू एवढा का घाबरतोस? भीड ही भिकेची बहिण असते. अशा पद्धतीने काम करशील तर तू भिकेला लागशील. त्याचं हे एवढं कडक बोलणं ऐकायलाही मला जड वाटू लागले. अजूनही ते तसंच बोलतात आणि बोलताना कोणतीही भीडभाड न ठेवता ते बोलतात. परंतु त्यांचे शब्द डोक्यामध्ये अगदी घर



**रामशेठ ठाकूरांसारखे वडील लाभणं आणि फक्त वडीलच नव्हे, तर नेता लाभणं किंवा गुरू लाभणंही फार मोठी गोष्ट आहे आणि मला तिन्ही व्यक्ती एकाच ठिकाणी भेटल्या ही माझ्यासाठी फार मोलाची आणि नशिबाची गोष्ट आहे.**



करून राहतात आणि त्यामुळे त्याच चुका या पुढच्या वेळी पुन्हा होऊ नये म्हणून तशी आम्ही काळजी घेतो. मराठी माणूस हा 'रिजेक्शन'ला फार घाबरतो. त्याच्या या नाजूकपणामुळेच अनेक संधी या हिरावल्या जातात. मी हे भीडस्तपणाचे चक्रव्यूव्ह थोड्याफार प्रमाणात भेदू शकलो असेन, तर त्याला वडिलांचा धाडसी आणि विस्तृत स्वरुपाचे विवेचन करण्याचा स्वभाव कारणीभूत आहे आणि त्याचा फायदा आम्हाला नक्कीच झाला. अशा स्वरुपाची स्थिती ही आपल्याबद्दल राहू नये याची काळजीही मी घेत राहिलेलो आहे. त्याला कारण म्हणजे रामशेठ ठाकूरसाहेबांचं विस्तृत स्वरुपाचे विवेचन हे आहे आणि त्याचा फायदा आम्हाला नक्कीच झाला. मी सांगेन की रामशेठ ठाकूरांसारखे वडील लाभणं आणि फक्त वडीलच नाही तर नेता लाभणं किंवा गुरू लाभणं ही फार मोठी गोष्ट आहे आणि मला

तिन्ही व्यक्ती एकाच ठिकाणी भेटल्या ही माझ्यासाठी फार मोठी नशिबाची गोष्ट आहे.

### तुम्हाला बदलत्या युगाबद्दल काय वाटतं?

प्रशांतदादाच चौथीपर्यंतच शिक्षण हे वाशीमध्ये झालं. त्यावेळेला शिक्षणासाठी तो वाशीला जायचा. त्यामुळे बराच काळ तो बाहेर होता. नंतरच्याकाळात रुपारेल कॉलेजला असल्यामुळे किंवा इंजिनिअरींग कॉलेजला असल्यामुळे त्याचा बराचसा वेळ हा बाहेरच गेला आणि नंतरसुद्धा व्यवसायाच्या निमित्ताने त्याला बाहेर राहावे लागले आणि त्या मानाने मला रामशेठ ठाकूरसाहेबांचा सहवास जास्त लाभला. त्याचा फायदा मला अनेक ठिकाणी झाला की, आमचे वडील म्हणजे आमचे आप्पा, हे कोणत्या परिस्थितीमध्ये कशा प्रकारे वागतात, कोणत्या प्रसंगी कशा प्रकारे निर्णय घेतात, हे जास्त जवळून मला पाहता आलं आणि त्यामुळे व्यवसायामध्ये आवश्यक असलेली कोणकोणती पाऊले उचलली गेली पाहिजेत, खाचाखोचा या बऱ्यापैकी कळून आल्या. पुढील काळामध्ये आणि विशेषता राजकारणामध्ये मला ज्याप्रकारची परिस्थिती आजमावावी लागली आणि त्यामुळे मलासुद्धा राजकारणामध्ये जावंच लागलं. एक टप्पा असा आला की आता राजकारणामध्ये उतरावं की नाही, असा प्रश्न पडलेला होता. त्यावेळेला रामशेठ ठाकूर साहेबांनी सांगितलं की, हो माझी इच्छा आहे की तू राजकारणात यावंस आणि त्यामुळे मी पूर्णवेळ राजकारणामध्ये सक्रिय राहण्याचा निर्णय घेतला. परंतु आता मात्र पुन्हा एकदा वाटायला लागलेलं आहे की बदलत्या युगानुसार पुन्हा एकदा व्यवसायाला वेळ द्यावा लागेल. परंतु रामशेठ ठाकूरसाहेबांचा जास्त सहवास लाभण्याचा मला नक्कीच फायदा झाला की, प्रत्येक टप्प्यावरती ज्यावेळेला मी हा विचार करतो की आता रामशेठ ठाकूरसाहेब माझ्या ठिकाणी असतील तर ते कशा स्वरुपाचा निर्णय घेतील? याचा अंदाज घेऊन मी पुढे जायचा निर्णय घेतो. दादांच्या तुलनेने मी स्वतःला जास्त नशीबवान समजतो हे मात्र नक्कीच आहे.



### तुमचे बाबा आणि तुमचे दादा याबद्दल काय वाटतं?

पाच वर्षांनंतर मी आता व्यवसायाकडे अधिक वळतो आहे. आपण पाहतोय की आपल्या आजूबाजूच्या कामांचे मोठ्या प्रमाणवर बदलत चालले आहे. म्हणजे आता तर बॅटरीवरच्या कार येत आहेत. तर मग 'इंजिन मॅकेनिक' जे होते त्यांना कामच राहत नाही. किंवा पूर्वी फोटोग्राफर, फोटो स्टुडिओ याला महत्व होतं आत त्यांचं युगच राहिलेलं नाही. पूर्वी तिकीट वगैरे काढणारे जे एजंट होते. पण आता त्यांचा बिझनेस फारच कमी झालेला आहे. व्यवसायाचं स्वरुप एवढं प्रचंड बदललेलं आहे. अविनाश धर्माधिकारीसाहेब तर म्हणत असतात की पुढच्या दहा वर्षामध्ये सत्तर टक्के काम (नॅचर ऑफ जॉब) हे बदललेले असणार आहे त्यामुळे मग आपल्यालाही तो विचार करावा लागणार आहे की, पुढचं युग जर असं असेल तर आता सध्याचा जो माझा बेस आहे तो त्यासाठी पक्का आहे का? तो जर नसेल तर भावनेच्या भरात आपण वाहून तर जाणार नाही ना? पटकन अडचणी वाढू शकतात, त्याचा अंदाज घेतला पाहिजे. तरच व्यवसायात टिकता येईल. रामशेठ ठाकूर यांच्याकडून आम्ही हेच शिकतो आहोत.

राजकारणाचा आजचा बाज हा नकारात्मक असतो. मात्र दादाने राजकारणामध्ये ती पॉझिटिव्हीटी दाखवलेली आहे. पनवेलच्या राजकारणामध्ये नकारात्मकता कमी प्रमाणात आहे. याचं श्रेय जितकं रामशेठ ठाकूरसाहेबांना जातं कदाचित एक टक्क्याने तरी जास्त हे प्रशांत ठाकूर यांना जातं. जे सहकारी त्यांच्यासोबत पुढे आलेले आहे आणि जी मंडळी राजकारणामध्ये प्रशांत ठाकूर यांच्याबरोबर आहेत, त्यामुळे पनवेलच्या

राजकारणात नकारात्मकता फार कमी आहे. महापालिकेमध्ये आलेले जे इतर अधिकारी असतात ते सुरुवातीला याचा उलटा अर्थ घेतात. त्यांना असे वाटते की, या राजकारण्यांना काही कळतच नाही आणि आपल्या मताप्रमाणेच सगळं इथे चालणार आहे. पण त्यांना जेव्हा कळतं की, आम्ही सगळे सकारात्मक कामांवर लक्ष देणारे आहोत. तेव्हा त्यांचंही सहकार्य मिळतं. आतापर्यंत या इथे आयुक्त म्हणून आलेले गणेश देशमुखसाहेब असतील, सुधाकर देशमुखसाहेब असतील या दोघांनीही मान्य केलं की, पनवेलचा बाज हा एकदम वेगळा आहे. इतर ठिकाणी ज्या चुकीच्या गोष्टी होतात, तशा चुकीच्या गोष्टी पनवेलमध्ये होत नाहीत आणि झाल्या तर रामशेठ त्या चालू देणार नाहीत. याचं श्रेय जसं रामशेठना आहे. तसंच, त्यापेक्षा एक टक्का अधिक दादाला म्हणजे आमदार प्रशांत ठाकूर यांनाही द्यायला हरकत नाही. ■






स्वर्गीय जनार्दन भगत जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ नेते एन.डी.पाटील यांना त्यावेळचे कामगारमंत्री आणि आजचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्याशुभहस्ते प्रदान करण्यात आला. डाव्या बाजूला आहेत सौ. सरोज एन.डी.पाटील, राज्यमंत्री आदिती तटकरे, आमदार आशिष शेलार. उजव्या बाजूला रामशेठ ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल पाटील, वाय.टी.देशमुख आणि अरुणशेठ भगत.



पनवेल येथील नवीन उड्डाणपूल





महाराष्ट्राचे आध्यात्मिक आदराचे स्थान निरुपणकार नानासाहेब धर्माधिकारी यांच्यानंतर त्यांचे सुपुत्र आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या सत्कारात सामील झालेले सर्व नेते. पनवेल येथील उड्डाणपुलाला श्री. रामशेठ ठाकूर यांनी 'नानासाहेब धर्माधिकारी उडडाणपूल' नाव देवून त्यांच्याबद्दलच्या आदराच्या भावना व्यक्त केल्या. व्यासपीठावर आमदार प्रशांत ठाकूरही दिसत आहेत.

रामशेठना मिळालेले पुरस्कार...